
Edition: I

बिदर जिल्हा
भौगोलिक माहिती आणि पर्यटन स्थळे

Geographical Information & Tourist Centre in Bidar District

ISBN: 978-93-5810-881-1

- डॉ. शिवानंद तानाजीराव जाधव
(M.A. Ph.D Geog)



Published By
Dr. Shivanand Jadhav (Ic Principal),
Shri Sant Gajanan Mahavidyalaya, Kharda Tal. Jamkhed Dist. Ahmednagar 413204. Web. www.ssgmkharda.in

ISBN: 978-93-5810-881-1

बिदर जिल्हा: भौगोलिक माहिती आणि पर्यटन स्थळे

(Geographical Information & Tourist Centre in Bidar District)



मी शिकावं... म्हणून
कष्टकरणाऱ्या त्या
मातेच्या चरणी
अर्पण

Book Title	:	**बिदर जिल्हा भौगोलिक माहिती आणि पर्यटन स्थळे** **(Geographical Information & Tourist Centre in Bidar District)**
ISBN Number	:	**978-93-5810-881-1**
Name of Publisher:		**Dr SHIVANAND TANAJIRAO JADHAV**
Language	:	**Marathi**
Country of Publication:		**INDIA**
Product Composition:		**Single-component retail product**
Product Form	:	**Book**
Date of Publication:		**11/01/2023**
Edition	:	**Ist**
Type of Author/Editor:		**Author**
Author	:	**Dr SHIVANAND TANAJIRAO JADHAV**
Prize:	:	**130**

ISBN: 978-93-5810-881-1

दोन शब्द...

प्रत्येकाला आपल्या जन्मभूमी बद्दल जिव्हाळा, आपुलकी व हेवा असतोच आणि तो असायलाच हवा कारण म्हंटल जात ना 'जननी, जन्मभूमी स्वर्ग से महान है'अगदी या उक्तीप्रमाणे प्रत्येकजण आपल्या जन्मभूमीवर प्रेम करत असतो त्यामुळे प्रत्येकाच्या मनात भूमी बद्दल वेगळाच आदर आहे. माझ्या मनातही माझ्या जन्मभूमी बद्दल नेहमीच जिव्हाळा आहे. या जन्मभूमीची इत्यंभूत माहिती मिळवणे हा माझा उद्देश्य होता मात्र बिदर हा कर्नाटकातील एक ऐतिहासिक जिल्हा असून कल्याणीचे चालुक्य व बिदरची बारीदशाही या राजकीय घराण्याचा उदय झालेल्या भूमीत, महात्मा बसवेश्वरांनी समतेची शिकवण दिलेल्या परिसरात, मराठी भाषेचे प्रभुत्व असतानाही बिदर जिल्ह्याची माहिती मराठीतून मिळवणे मला कठीण गेल्याने या भूमीतील प्रत्येकाला मराठीतून अगदी सुलभ मिळावी याच उद्देश्याने हा लेख प्रपंच. या ग्रंथाचा उपयोग अनेक भूगोल अभ्यासकांना, पर्यटकांना सुद्धा मार्गदर्शक ठरेल. या ग्रंथातील माहिती सर्वोतोपरी विविध प्रकारच्या प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या माध्यमातून मिळवलेली असल्याने पडताळणी करून बहुदा अचूक मांडणी करण्याचे प्रयत्न केलेलं आहे. त्यात कांही उणीवा किंवा चुका आढळल्यास ती माझी चूक समजून मला सुचवाल हीच अपेक्षा.

स्वामी दयानंद सरस्वतीच्या विचारांनी प्रेरित होऊन आर्य समाजाचे निस्वार्थी व निस्सीम कार्य करत सरस्वतींचे विचार आपल्या जन्म व कर्मभूमीत प्रसारित करणारे आमचे कुटुंब प्रमुख, आदर्श शिक्षक, श्री शंकरराव गुरुजी, भूमीच्या रक्षणासाठी सीमेवर लढणारे माजी सैनिक श्री. नरसिंग जाधव यांच्यामुळेच अगदी लहानपणापासून माझ्या मनात जन्मभूमी बद्दलचे प्रेम रुजले. कार्यामुळे गावापासून दूर राहूनही जन्मभूमीचा जिव्हाळा बाळगणारे महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे तज्ञ सदस्य डॉ. ओमप्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनामुळे मला हा ग्रंथ किंवा माहिती आपल्या समोर आणायची होती त्याला आर्या नॉशनल पब्लिकेशन, बसवकल्याण यांनी मूर्त रूप देवून भारत सरकारच्या उच्च शिक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखालील राजाराम मोहनराय नॉशनल एजन्सीने मान्यता दिली म्हणून ते आज आपल्या पर्यंत पोहचत आहे.

-डॉ. शिवानंद जाधव

ISBN: 978-93-5810-881-1

अनुक्रमणिका

१. बिदर जिल्हा: भौगोलिक माहिती: १

बिदर जिल्हाची ओळख: १

हवामान: ३

जलप्रणाली: ४

मृदा: ६

सेवा सुविधा: ६

२. बिदर जिल्ह्यातील पर्यटन स्थळे ८

पर्यटन स्थळे: १०

३. बिदर तालुक्यातील पर्यटन स्थळे: ११

बिदरचा किल्ला: ११

महमूद गवान मदरसा: १४

अष्टूर येथील बहमनी थडगे : १५

बरीदशाही थडगे/मकबरे (बरीदशाही पार्क): १७

चौबारा घड्याळ टॉवर: १८

देव देवा वाणा पार्क (बोटॅनिकल गार्डन): १९

ब्लॅक बक रिसॉर्ट: २०

गुरुद्वारा गुरुनानक झिरा साहिब: २१

श्री क्षेत्र झरणी नृसिंह मंदिर: २३

पापनाश शिव मंदिर: २४

ब्रिदीकला: २५

४. बसवकल्याण तालुक्यातील पर्यटनस्थळे: २७

बसवकल्याणचा किल्ला: २८

अनुभव मंटप: ३०

नवीन आधुनिक 'अनुभव मंडपम' ३१

उमा महेश्वरा मंदिर, उमापूर: ३३

शिव मंदिर, नारायणपूर: ३४

ISBN: 978-93-5810-881-1

श्री कमलेश्वरा मदिर जलसांगवी ३४
दर्गाह हजरत ताजुद्दीन बाबा शेर-ए-सावर व हजरत खाजा बंदे नवाज गेसू ३५
हुतात्मा स्मारक: गोर्टा ३६
श्री सदानंद स्वामी मठ : ३७
बसवेश्वर मंदिर: ३७
परस कट्टा: ३८
बसवेश्वर महामने: ३८
बाल उद्यान: ३८
शिवसृष्टी : ३८
मोरखंडी: ३९

५. भाल्की तालुक्यातील पर्यटनस्थळे: ४०

भाल्कीचा किल्ला : ४०
मैलार मल्लना मंदिर: ४१
कारंजा जलाशय: ४३

६. हुमनाबाद तालुक्यातील पर्यटनस्थळे ४४

श्री विरभद्रेश्वर मंदिर : ४४
श्री माणिकप्रभू मंदिर: ४५
राजराजेश्वरी देवी मंदिर हुमनाबाद: ४६
जलसंगी: ४६

७. औराद तालुक्यातील पर्यटनस्थळे ४८

श्री. अमरेश्वर मंदिर ४८

संदर्भ ५०

ISBN: 978-93-5810-881-1

१. बिदर जिल्हा: भौगोलिक माहिती:

बिदर जिल्हाची ओळख:

महाराष्ट्र आणि तेलंगणा या दोन राज्यालगत कर्नाटक राज्याच्या ईशान्येचा टोक म्हणून ओळख असलेल्या बिदर जिल्हास फार मोठा प्राचीन, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. अनेक राजघराण्यांनी या ठिकाणी राज्य केलेली आहेत. मध्ययुगीन काळात हिंदू धर्माचा पाया या भागात रचण्यात आलेला आहे. प्राचीन काळात 'बांबूच्या जंगलाचा प्रदेश म्हणून 'बिदीरू' या शब्दापासून अपभ्रंश होऊन 'बिदरुरु', 'बिदरे' व शेवटी 'बिदर' शब्दाची उत्पत्ती झाली असावी किंवा बिदरला त्याचे नाव बिद्रीच्या कलेमुळे मिळाले असावे असे जाणकारांचे मत असले तरी महाभारतातील पारंपरिक कथेवरून या भागात पांडू व धृतराष्ट्राचा सावत्र भाऊ विदुर येथे राहत असल्याने हा भूभाग 'विदुर्गनगरी' या नावाने ओळखले जात असे.

इ.स.पू. तिसऱ्या शतकात हा मौर्य साम्राज्याचा भाग होता. मौर्य, सातवाहन, कदंब आणि बदामीचे चालुक्य आणि नंतर राष्ट्रकुट यांनी बिदर प्रांतावर राज्य केले नंतर तो देवगिरीच्या यादवांच्या आणि काकतीयाच्या वारंगल घराण्याच्या कब्जात होता. इ.स. सहाव्या शतकापासून ते आठव्या शतका पर्यंत या प्रदेशावर बदामीच्या चालुक्यांचे राज्य होते इ. स. ९७३ मध्ये राष्ट्रकूटांनी मालखेड (सध्या गुलबर्गा जिल्ह्यातील ठिकाण) येथे राजधानी स्थापन करुन चालुक्यांना विस्थापित केल्याने चालुक्यांनी कल्याण या ठीकांणी आपली राजधानी निर्माण केल्याचे दिसून येते या वरूनच त्यांना कल्याणीचे चालुक्य म्हणून ओळखले जात. कल्याणीच्या चालुक्य घराण्यामध्ये विक्रमादित्य सहावा हा पराक्रमी राजा निर्माण होऊन गेला. त्यानंतर सोमेश्वर राजांनी या भूमीला वैभवसंपन्न बनवल. राष्ट्रकुटांच्या काळात बिदर हे राष्ट्रकुटांची राजधानी 'मयुरखंडी' या नावाने प्रचलित होते. त्यानंतर १२ व्या शतकात कल्याणच्या बिज्जळ राजाच्या दरबारातील महान सामाज सुधारक महात्मा बसवेश्वरांनी कल्याणला सामाजिक, धार्मिक चळवळीचे केंद्र निर्माण करून शैव धर्माचे पुनरुज्जीवन आणि स्थापना केली. अनुभवमंटपच्या माध्यमातून लोकशाहीप्रणित लोककल्याणकारी राज्य कारभारची शिकवण त्यांनी येथूनच दिलेली आहे.

बहामनी काळात इ.स. १३४६ मध्ये जफरखान (हसन गंग) ऊर्फ उल्लाउद्दीन हसन बहामनशहाने बीदरला गुलबर्गा राजधानीतील प्रांतीय कार्यालय बनवले व नंतर इ.स १४२९ मध्ये बिदरलाच राजधानी बनवले. त्यानंतर या भागाला अहेमदाबाद (बिदर) म्हणून ओळखले गेले. इ.स. १४३२ मध्ये अहमदशहा वली यांनी बीदरचा किल्ला बांधला. बहमनी सल्तनतच्या राजवटीतील बिदरला 'मुहम्मदाबाद' म्हणूनही ओळखले जात असे. इ.स. १५३८ मध्ये बहामनी साम्राज्य संपुष्टात येऊन त्याची पाच शाह्यांत विभागणी झाली. त्यापैकीच एक बीदरची बरीदशाही होय. तिचा पहिला बरीदशहा म्हणून अली बरीदशहाकडे पाहिले जाते. ती जवळपास १२२ वर्षे अस्तित्वात होती. पुढे इ.स. १६१९ मध्ये बरीदशाही विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यात गेली व नंतर इ.स. १६५६ ला मोगल सम्राट औरंगजेबाने विजापूरची सुलतानशाही आपल्या अधिपत्याखाली घेतल्याने या भागावर मोगली सत्ता प्रस्थापित झाली. त्यामुळे


ISBN: 978-93-5810-881-1

दक्षिण भारतात दौलताबाद नंतर बिदर हे अत्यंत महत्त्वाचे शहर बनल्याने दक्षिण दिग्विजयासाठी बिदर हे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे १८ व्या शतकात या भागावर हैद्राबाद च्या निजामाचे वर्चस्व प्राप्त झाल्याने निजामकालीन प्रत्येक नवाबाने हैद्राबाद संस्थानात बिदर शहर आणि या भागाला लष्करी, सामारिक आणि राजकीयदृष्ट्या महत्त्व दिल्याने निजामी राजवटीत हैद्राबाद, औरंगाबाद नंतर बिदर हे तिसऱ्या क्रमांकाचे महत्वाचे शहर बनले. पुढे निजामाचे दमणकारी धोरण व दडपशाही यामध्ये जिल्ह्याचा विकासाला खीळ बसली. भारतीय स्वातंत्र्यानंतर संस्थानिकांचे विलीनीकरणामुळे हैदराबादच्या निजामाची सत्ता संपूष्टात येऊन १ नोव्हेंबर १९५६ ला बिदर कर्नाटकात तत्कालीन म्हैसूर राज्यात सामील करण्यात आले. भाषिक आधारावर राज्याची पूर्नरचना होताना हा जिल्हा मराठी बहुभाषिक असूनही कर्नाटक राज्यात समाविष्ट केला गेला. अलिकडील काळात या जिल्हासह निजाम संस्थानातील कर्नाटकातील भूभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कर्नाटक सरकारने विशेष लक्ष केंद्रित करून विकास साधण्याचे विशेष प्रयत्न सुरु केलेले आहेत.

बिदर हा जिल्हा कर्नाटकातील महत्वाचा जिल्हा असून जिल्ह्याच्या ईशान्येस महाराष्ट्रातील नांदेड, उत्तरेस लातूर, वायव्येस उस्मानाबाद, अग्नेयेस तेलंगणा राज्यातील जहीराबाद आणि पूर्वेस निजामाबाद दक्षिणेस कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्याच्या सीमा लाभल्याने हा जिल्ह्या महाराष्ट्र-कर्नाटक व तेलंगाना यांना जोडणारा महत्वाचा दुवा आहे. हा जिल्हा कर्नाटक राज्यातील उत्तरेकडील शेवटचा जिल्हा असल्याने कर्नाटकाची राजधानी असलेल्या बंगळूरु पासून ६७६ कि.मी. अंतरावर आहे. जिल्ह्याचे अक्षवृत्तीय विस्तार १७°३५′१८″ उत्तर अक्षवृत्त ते १८°२९′१५″ उत्तर अक्षवृत्त व रेखावृत्तीय विस्तार ७६°४१′२०″ पूर्व रेखावृत्त ते ७७°४०′१२″ पूर्व रेखावृत्त असा असून जिल्ह्याची पूर्व-पश्चिम लांबी १०२ किमी. तर उत्तर-दक्षिण लांबी ९८ किमी. आहे. या जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५४४८ चौ. किमी असून जिल्ह्याचा उत्तरेकडील भाग सपाट, काळी माती व बेसॉल्टिक खडकाचा तर दक्षिणेकडील अर्धा भाग समुद्र सपाटीपासून सुमारे ७१५ मीटर उंच असून येथील जमीन पाण्याचा निचरा होणारी आहे संपूर्ण जिल्ह्याची सरासरी समुद्र सपाटीपासूनची उंची ५०० ते ६०० मी. आहे. हा जिल्हा गोदावरी आणि कृष्णा या दोन नदी खो-यांतर्गत येतो. जिल्ह्याची मुख्य नदी मांजरा नदी असून ती गोदावरी नदीची उपनदी आहे तर कारंजा ही मांजरा नदीची उपनदी आहे.

जिल्ह्याचे विभाजन बिदर, बसवकल्याण, भाल्की, हुमनाबाद व औराद अशा पाच तालुक्यात करण्यात आलेले होते. मात्र नुकतेच बसवकल्याण तालुक्याचे विभाजन करून हुलसूर व औराद तालुक्याचे विभाजन करून हुलसूर असे आज मितीला सात तालुके असून बिदर व बसवकल्याण असे दोन प्रशासकीय विभाग आहेत.

कर्नाटक राज्य बिदर जिल्हा



बिदर जिल्ह्याच्या उत्तरेकडे औराद तालुक्यात बालाघाटच्या डोंगर रांगा साधारणपणे वायव्ये ते अग्नेय दिशेत पसरलेल्या आहेत. या डोंगराळ प्रदेशाची समुद्र सपाटीपासूनची उंची ६५५ मीटर इतकी आहे. बिदर तालुक्याच्या उत्तरेकडील भाग, औराद तालुक्याचा दक्षिण भाग व भाल्की तालुक्याचा बहुतांश भाग हा मध्यवर्ती कमी उंचीचा भूभाग आहे. जिल्ह्यातील पूर्ववाहिनी नद्यांमुळे या भूभागाची उंची पश्चिमकडून पूर्वेकडे कमी झालेली दिसून येते. तर जिल्ह्यातील बिदर, हुमनाबाद आणि बस्वकल्याण तालुक्यातील भूभाग हा जास्त उंचीचा असून हा प्रदेश पश्चिम पूर्व दिशेत पसरलेल्या बालाघाट डोंगर रांगाने व्यापलेला असून या भागास बिदरचे पठार म्हणून ओळखले जाते. या भागातील कारंजा, मधूरा आणि मुल्लापूरी या नद्यामुळे बिदर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील भूभाग ठिक-ठिकाणी खंडीत झालेला दिसून येतो.

हवामान:

जिल्ह्यामध्ये नैऋत्य मान्सून वगळता हवामान संपूर्ण वर्षभर सामान्यतः कोरडे असते. उन्हाळा हा वर्षातील सर्वात कोरडा असतो. उन्हाळी हंगामाच्या उत्तरार्धात आणि पावसाळ्यात वा-यांचा जोर सामान्यतः मध्यम असतो. नैऋत्य मोसमी हंगामात, वारे प्रामुख्याने नैऋत्य आणि ईशान्य दिशांच्या दरम्यान वाहतात. पावसाळ्यानंतरच्या काळात, वारे प्रामुख्याने उत्तर आणि पूर्व दिशांमधून वाहतात. हिवाळ्यात वारे दिशा बदलत असतात.जिल्ह्यात डिसेंबर हा सर्वात थंड महिना आहे.

तापमान:

जिल्ह्यातील सरासरी दैनिक कमाल तापमान २७.३ अंश सेल्सिअस आणि सरासरी दैनिक किमान तापमान १६.४ अंश सेल्सिअस असते तर मे हा सर्वात उष्ण महिना असतो ज्यात सरासरी दैनिक कमाल तापमान ३८.८ अंश सेल्सिअस आणि सरासरी दैनिक तापमान किमान २५.९ अंश सेल्सिअस असते.

ISBN: 978-93-5810-881-1


बिदर जिल्ह्यामध्ये मुख्यत्वे नैऋत्य मोसमी वा-यापासून सर्वसाधरणपणे मृग नक्षत्रापासून अर्थात ७ ते ८ जूनपासून पावसाला सुरुवात होते. येथे सरासरी वार्षिक पर्जन्य ८४७.२ मिमी होतो तो जून ते सप्टेंबर या कालावधीत वार्षिक सुमारे ८१% पडतो. सप्टेंबर महिन्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील पर्जन्यमानातील तफावत मोठी असल्याने जिल्हा अवर्षणप्रवण आहे. जिल्ह्यात पावसाळ्यात सरासरी ५२ दिवस पाऊस पडतो.

जिल्ह्याचे सरासरी वार्षिक किमान तापमान २० से. आणि कमाल तापमान ३१°से. च्या असल्याचे दिसून येते. या जिल्ह्यामध्ये मे महिन्यातील कमाल तापमान ३७.५ से. एवढे असून डिसेंबर महिन्यामध्ये किमान तापमानाची नोंद १२.९° से. असल्याचे दिसून येते. बिदर जिल्ह्याचे स्थान खंडांतर्गत असल्यामुळे याठिकाणी कमाल आणि किमान तापमानामध्ये असलेली तफावत ही जास्त असल्याचे दिसून येते. विशेषतः नोव्हेंबर महिन्यापासून ते मार्च महिन्यापर्यंत म्हणजेच हिवाळा ऋतुमध्ये कमाल व किमान तापमानामध्ये असलेला फरक हा जास्त असतो.

जलप्रणाली:

जिल्ह्यातील सर्व भौगोलिक प्रदेश हा मुख्यता गोदावरी नदी खो-याचा असल्याने जिल्ह्यातील सर्व नद्या ह्या गोदावरी नदीच्या उपनद्या आहेत. या सर्व नद्या हंगामी स्वरूपाच्या असून त्या केवळ पावसाळ्यात प्रवाहित असल्याने उन्हाळ्यात त्या कोरड्या असतात.

मांजरा: हि जिल्ह्यातील प्रमुख नदी असून ती गोदावरी नदीची उपनदी आहे. जिल्ह्याच्या मध्य भागातून औराद, भाल्की व बिदर तालुक्यांच्या सिमेवरून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. ही नदी महाराष्ट्रातील बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातून पूर्वेकडे वाहत येवून हलसी तुगाव या गावाजवळ बिदर जिल्ह्यात प्रवेश करते. जिल्ह्यात मांजरा नदीच्या कारंजा, देवन, हब्बळ, मधूरा, कामधानी व औरादनाला या उपनद्या आहेत. जिल्ह्यातून हि नदी १५५ कि.मी लांब प्रवास करून पुढे ती तेलंगना व परत महाराष्ट्रातून प्रवास करत गोदावरी नदीस मिळते. या नदीचा एकूण लांबी ७२४ कि.मी. आहे.



ISBN: 978-93-5810-881-1

कारंजा: ही मांजरा नदीची प्रमुख उपनदी असून हीचा उगम बिदर तालुक्यातील मलचापूर गावाच्या ईशान्य भागात समुद्र सपाटीपासून ६३९ मीटर उंचीवरून होतो. ही नदी वायव्येकडून अग्नेयेकडे वाहत जावून कोलार (बु), बकचावडी, कामठाणा, तेलंग (मिर्झापूर) पर्यंत वाहते वबारूर जवळून राज्याची सीमा ओलांडून तेलंगना राज्यात वाहत जाते. परंतु ही नदी भांगूर गावाच्या पूर्वेकडून पुन्हा जिल्ह्यात प्रवेश करून उत्तर पश्चिमेस वाहते. इंदिरानगर, ब्याळहाळी, नेलवाड, हंजी (खु), गोडी हिप्परगा, डावरगाव, कोरूर, हरनाळ, निडेबन, आनंदवाडी, सायेगाव, खुदावंदपूर व वागलगाव या वसाहतीजवळून वाहत जाते व नारदासंगम जवळ मांजरा नदीस मिळते. कारंजा नदीची जिल्ह्यातील एकूण लांबी ७४ कि.मी. असून बिदर, हुमनाबाद, व भाल्की तालुक्यांची जीवनरेखा म्हणून ओळखली जाते. या नदीवर भाल्की तालुक्यात ब्याळहळ्ळी गावाजवळ १९६३ मध्ये कारंजा धरणाची निर्मिती करण्यात आलेली आहे. कारंजा नदीच्या उपनद्यामध्ये प्रामुख्याने चुल्की, चांदरी व दोडाहल्ला या नद्यांचा समावेश होतो.

धडकनाळ: औराद तालुक्यातील माळेगावच्या उत्तरेकडे समुद्र सपाटीपासून ६१० मीटर उंचीवरील डोंगरगाव टेकड्यावरून धडकनाळ नदीचा उगम होतो. ही नदी उत्तर वाहिनी नदी असून ती लेंडी नदीची उपनदी आहे. उत्तरेस भंडारकुमठा, खेर्डा (बु), मुदखेड व नंदीबिजलगाव या वसाहतीजवळून वाहत जावून ती नांदेड जिल्ह्यात प्रवेश करते. या नदीची जिल्ह्यातील एकूण लांबी २१ कि.मी. आहे.

केंद्री नदी हि लेंडी नदीची उपनदी असून ती उत्तर वाहिनी नदी आहे. देगलूर तालुक्यातील वारच्या नैऋत्येस समुद्रसपाटीपासून ५८२ मीटर उंचीवरून राधाबाई टेकड्यामध्ये या नदीचे उगम होतो. बोन्थी व बावलगावच्या जवळून ही नदी वाहत जावून मुक्रमाबाद शहराच्या पश्चिमेस उजवीकडून लेंडी नदीला मिळली आहे.

कामधानी ही मांजरा नदीची उपनदी असून ती पूर्व वाहिनी नदी आहे. या नदीचा उगम औराद तालुक्यातील मुंगनाळ गावाच्या पश्चिमेस होतो. या नदीची जिल्ह्यातील लांबी १९ कि.मी. आहे.

मुल्लामरी नदी कृष्णा नदीची उपनदी असून तिचा उगम हि बस्वकल्याण तालुक्यातील मंठाळा या गावाजवळील डोंगरात समुद्रसपाटीपासून ६५० मीटर उंचीवर होतो. अतलापूर, मिर्झापूर व एरंडी या गावाजवळून अग्नेय दिशेत वाहते. खेर्डा (बु) या वस्तीजवळ तलाव असून ही नदी पुढे धानूरा (रा) व हल्लीखेड (खु) च्या दक्षिणेकडून वाहत जावून गुलबर्गा जिल्ह्यात प्रवेश करते. या नदीची जिल्ह्यातील एकूण लांबी ३८ कि.मी. आहे. असून ती दक्षिणदिशेत वाहत जाऊन कृष्णा नदीला मिळते.

गांदरी या नदीचा उगम बस्वकल्याण तालुक्यातील उर्की गावच्या दक्षिणेस समुद्रसपाटीपासून ५८३ मीटर उंचीवर होतो. हि दक्षिण वाहिनी नदी असून ती कृष्णा नदीची उपनदी आहे. ही नदी आलगूड, वड्डरगा, सरजवळगा व सिरगापूर या गावाच्या पूर्वेकडून वाहत जावून गुलबर्गा जिल्ह्यात प्रवेश करते. जिल्ह्यातील या नदीची एकूण लांबी २२ कि.मी. आहे.

मृदा:

जिल्ह्यामध्ये सर्वसाधारणपणे उथळ लाल रंगाची, खोल लालसर रेताड जांभी मृदा, खोल काळी चिकन मृदा, आणि खोल काळी गाळाची मृदा असे मृदेचे चार प्रकार दिसून येतात. औराद व भाल्की तालुक्यात प्रामुख्याने सुपीक काळी मृदा आहे. बिदर आणि हुमनाबाद तालुक्यांमध्ये प्रामुख्याने लॅटरिटीक लाल मृदा आहे. बस्वकल्याण तालुक्याच्या नैऋत्येकडील बराच भाग व हुमनाबाद तालुक्याच्या दक्षिणेकडील काही भागात उथळ लाल रंगाची मृदा आढळते. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या १७४१.४२ चौ. किलोमीटर क्षेत्र या मृदेचे असून उथळ लाल रंगाच्या मृदेत लोह, मॅग्नेशियम व पोटॅशियम हि घटकद्रव्ये असून नत्र व कॅल्शियमचे प्रमाण कमी आहे.

मांजरा आणि कारंजा या नद्यांच्या खो-यामध्ये खोल गाळाची, चिकन मृदा आढळते. या प्रकारच्या मृदेत गाळ व चुनखडीचे मिश्रण असते. यात सेंद्रीय द्रव्ये, कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम व फॉस्फरसचे प्रमाण भरपूर असल्याने या मृदेची सुपीकता जास्त असते. या मृदेने १३४८.३७ चौ. किलोमीटर एवढे क्षेत्र व्यापले आहे.

काळया मृदेला रेगूर मृदा या नावाने देखील ओळखले जाते. या मृदेचे क्षेत्र १२४४.६५ चौ. किमी. एवढे आहे. जिल्ह्यातील बिदर, भाल्की व हुमनाबाद तालुक्यात ही मृदा आढळते. या मृदेत लोह, मॅग्नेशियम, कॅल्शियम इत्यादी घटक द्रव्ये आहेत म्हणून ही मृदा अतिशय सुपीक असते.

बिदर जिल्ह्याचा प्रदेश पठारी असून उष्ण कटिबंधीय प्रदेशात येतो. या जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही मुख्यत्वे शेती व शेतीशी निगडीत व्यवसायांशी आहे. शेती मुख्यत्वे मान्सून पर्जन्यावर अवलंबून असल्याने लहरी पाऊसाचा फटका अनेकदा येथील शेतक-यांना बसतो. येथील वनस्पती पानझडी आहेत व मृदा जास्तीत जास्त जांभी आहे. जिल्ह्यातील सुपिक जमिनीचे वितरण असमान असल्यामुळे काही भाग विशेषतः नदी खो-याच्या प्रदेशातील भाग हा सुपिक तर डोंगराळ व खडकाळ भागातील जमीन पडीक स्वरुपाची अथवा कमी उपजाऊ आहे, त्यामुळे जिल्ह्यातील काही भागात आर्थिक सुबत्ता तर काही भागात दारिद्र्य दिसून येते. बिदर जिल्ह्यातील ९० टक्के क्षेत्र कमी पर्जन्याच्या क्षेत्रात मोडते. त्यामुळे येथील शेतक-यांचे जीवन आर्थिक दृष्टीकोणातून हालाकीचे आहे. सिंचनाचे प्रमाण कमी असल्याने जास्तीत जास्त शेती खरीप हंगामावरच आहे. शहरात उद्योग व्यवसायांचा विकास कमी प्रमाणात झाल्यामुळे जिल्ह्यामध्ये ग्रामीण वस्तीचे प्रमाण जास्त आहे.

सेवा सुविधा:

कोणत्याही प्रदेशाच्या विकासात वाहतुक आणि दळणवळणाची साधने ही महत्त्वाची भूमिका बजावतात. बिदर जिल्हा हा तसा कर्नाटकाच्या स्थान आणि विस्तारात उत्तरेकडील अति दूरवरचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. मुंबई-पुणे-हैद्राबाद-तिरुपती-चैन्नई, नांदेड-उदगीर-बेंगलुरू, अशा महाराष्ट्र तेलंगणा आणि हैद्राबादशी जोडणारा हा जिल्हा दुवा म्हणून ओळखला जातो.


ISBN: 978-93-5810-881-1

रस्ते मार्ग: या जिल्ह्यामध्ये एकूण रस्ते मार्गाची लांबी १७०९.९२ किलोमीटर असून त्यामध्ये जिल्हा रस्त्यांची लांबी सर्वात जास्त ८८०.०८ किलोमीटर असून सर्वात कमी लांबीचे रस्ते राष्ट्रीय महामार्गाचे असून ते केवळ २१० किलोमीटर लांबीचे आहेत. या जिल्ह्यातून ५९७.८४ किलोमीटर लांबीचे राज्य महामार्ग रस्त्यांचे जाळे पसरले आहे.

जिल्ह्यात बिदर तालुक्यामध्ये सर्वात जास्त रस्त्यांची लांबी ३८७.४५ किलोमीटर असून त्याखालोखाल हुमनाबाद तालुक्यामध्ये रस्त्यांची लांबी ३८१.७२ किलोमीटर एवढी आहे. सर्वात कमी रस्त्यांची लांबी भाल्की तालुक्यात २२३.२० किलोमीटर आहे.

रेल्वे मार्ग: बिदर जिल्हा हा स्वातंत्र्यापूर्वी हैद्राबादच्या निजामी राजवटीत होता. हैद्राबाद संस्थानांतर्गत बिदर हे तत्कालीन महत्वाचे ठिकाण असल्याने राजधानी हैद्राबादपासून मराठवाड्याशी संपर्क, वाहतुक आणि दळणवळणासाठी निजामाने १९३० मध्ये हैद्राबाद ते मनमाड आणि काचीगुडा ते मनमाड असा बिदर मार्गे रेल्वे मार्ग जोडला होता. बिदर जिल्ह्यात एकूण रेल्वे मार्गाची लांबी ७९ कि.मी. असून जिल्ह्यातील औराद, भाल्की, बिदर या तीन तालुक्यातून रेल्वे मार्ग जातो.

हवाई वाहतूक: बिदर जिल्हा हा रेल्वे आणि रस्ते मार्गाशिवाय हवाई मार्गाने इतर ठिकाणांशी जोडलेला आहे. तथापि बिदरहून जनतेसाठी नागरी हवाई वाहतुक सेवा उपलब्ध नाही. जिल्ह्यातील हवाई तळ हे लष्करासाठी राखीव असून या ठिकाणी लष्करी हवाई प्रशिक्षण केंद्र म्हणून त्याचा वापर केला जातो.



संदेशवहन: आधुनिक काळात विकासाचा एक पैलू असलेले संदेशवहन आणि इंटरनेट जोडणी हा विकासाचा निर्देशांकही मानला जातो. वर्ष २०१७-१८ च्या आकडेवारीवरुन बिदर जिल्ह्यात टेलीफोनची संख्या ९१६३, इंटरनेट जोडणीची एकूण संख्या ३१५५ इतकी असून मोबाईल धारकांची एकूण संख्या १२४५८८ एवढी आहे. या व्यतिरिक्त जिल्ह्यात एकूण ३०४ पोस्ट ऑफिस आहेत.

ISBN: 978-93-5810-881-1

२. बिदर जिल्ह्यातील पर्यटन स्थळे

बिदर हे कर्नाटक राज्यात उत्तर भागातील एक इतिहास प्रसिद्ध शहर व जिल्ह्याचे ठिकाण असून कर्नाटक- तेलंगणा- आंध्रप्रदेश व महाराष्ट्र या राज्यामधील अत्यंत महत्वाचा दुवा आहे. कर्नाटक राज्याची राजधानी बेंगलोर पासून ७१० कि.मी., महाराष्ट्राची राजधानी मुंबईपासून ६५०कि.मी तेलंगणाची राजधानी हैदराबाद पासून १५० कि.मी. तर अंतरावर आहे.

हा जिल्हा महाराष्ट्रातील उस्मानाबाद, लातूर, नांदेड कर्नाटकातील गुलबर्गा, तेलंगणा राज्यातील निझामाबाद जिल्हाशी रस्ते महामार्गाने जोडलेला असून राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ द्वारे तो महाराष्ट्र-कर्नाटक व आंध्रप्रदेशातील प्रमुख शहरांशी जोडलेला आहे. तर राष्ट्रीय महामार्ग क्र. १३ द्वारे महाराष्ट्र-कर्नाटकातील बिजापूर सह इतर शहरांशी जोडलेला आहे. शहरातून बेंगलुरू व हैद्राबाद या प्रमुख शहरासह देशाच्या अनेक शहरात रेल्वे मार्गे प्रवास केला जातो. बेंगलुरू-वाडी-झैराबाद-नांदेड या रेल्वे मार्गावरील बिदर एक मुख्य रेल्वे स्थानक आहे या व्यतिरिक्त नव्याने बिदर-गुलबर्गा रेल्वेमार्ग विकसित करण्यात आलेला आहे. शहरात हवाईमार्गाने येण्यासाठी हैद्राबाद हे जवळचे विमानतळ (एअरपोर्ट) १३४ कि.मी. मुंबई आतरराष्ट्रीय विमानतळ ५८६ कि.मी. अंतरावर आहे. या व्यतिरिक्त हुबळी ४७३ कि.मी. बेळगावी ४९० कि.मी.अंतरावरील विमानतळ आहेत. बिदर येथे संरक्षण दलाचे हवाई प्रशिक्षण केंद्र असल्याने येथील विमानतळ सार्वजनिक नाही.

१० व्या शतकात बिदरवर **कल्याणी** चालुक्यांचे राज्य होते आणि त्यांची राजधानी कल्याण (सध्याचे बसवकल्याण) होते. ११ व्या शतकात देवगिरीचे यादव आणि वारंगळ येथील बिज्जळ कलचुरी या दोन नव्या सत्तांनी चालुक्यांच्या साम्राज्याला जबरदस्त आव्हान दिल्याने चालुक्यांची सत्ता संपुष्टात आली व बिदर शहर **बिज्जळ कलचुरी** साम्राज्याचा भाग बनला. १४ व्या शतकाच्या सुरुवातीला दिल्लीचा मुहम्मद बिन तुघलकाने वारंगळवरील स्वारीत बिदर शहराला वेढा देऊन हे शहर आणि येथील किल्ला जिंकून त्याने हे शहर दिल्ली साम्राज्याला जोडले व हिंदू सत्ता संपुष्टात आणली व त्याने इ.स. १३४१ मध्ये नुसरतखान याची बिदर सुभ्याचा प्रमुख म्हणून नियुक्ती केली. नुसरतखान यांनी इ.स. १३४५ ला **तुघलक** सत्तेविरुद्ध बंड केल्याने कुतलुघखान हा सुभेदाराने त्यांचे बंड मोडीत काढून आमीर अली या अधिकाऱ्याची बिदर सुभ्याचा प्रमुख म्हणून नेमणूक केली. त्यानेही नंतर तुघलक सत्तेविरुध्द अयशस्वी बंड केले होते. इ.स. १३४७ साली दक्षिणेकडील मुस्लिम सरदारांनी तुघलक सत्तेविरुद्ध बंड केल्याने अल्लाउद्दीन हसन गंगू उर्फ जफरखान या सरदाराने वारंगळच्या राजाच्या मदतीने बिदर शहर व किल्ल्यावर हल्ला चढवून तुघलक सैन्याचा पराभव केला व त्यांने दक्षिणेतील तुघलक घराण्याची सत्ता संपुर्णपणे संपुष्टात आणली आणि **'बहमनी'** साम्राज्याची स्थापना केली त्याची राजधानी कांही काळ दौलताबाद होती. नंतर हि राजधानीगुलबर्गा (सध्याचे कलबुर्गी) येथे हलवण्यात आली. बहमनी सुलतान अहमदशाह (नववा) बहमनी हा सुलतान झाल्यानंतर त्यांने इ.स. साली १४२५ आपली राजधानी गुलबर्गा येथून बिदरला हलवल्याने याच्या काळात (१४२२–१४३६) या शहराची भरभराट झाली. सुलतान अहमदशाह

याच्या कारकिर्दीत बीदर हे एक प्रमुख सांस्कृतिक आणि धार्मिक केंद्र म्हणून प्रसिद्धीस आले. इ.स. १४६१ मध्ये बारावा बहमनी सुलतान निजामुद्दीन अहमद हा सत्तेवर आला. तो अल्पवयीन असल्याची संधी साधून ओडिशा (ओरिसा) आणि वारंगळ येथील राज्यांनी एकत्र येऊन बहमनी साम्राज्यावर हल्ला केला असताना बहमनी सरदार महमूद गवान आणि ख्वाजा जहान यांनी शर्थीचा लढा देऊन हे आक्रमण परतवून लावले. त्यानंतर लगेच माळव्याचा सुलतान महमूद खिलजीने बिदर शहरावर आक्रमण करून बहमनी सैन्याचा पराभव करून शहर जिंकले. त्यानंतर बहमनी सरदार महमूद गवान याने अल्पवयीन सुलतानाला फिरोजाबाद शहरात हलवून गुजरातचा सुलतान महमूद बेगडा याच्या मदतीने परत बिदर शहर ताब्यात घेऊन पुन्हा बहमनी सत्ता प्रस्थापित केली मात्र नंतर महमूद गवानचा बिदरच्या किल्ल्यातच खून करण्यात आला.

चौदावा बहमनी सुलतान शिहाबुद्दीन मुहम्मद नंतर झालेले सुलतान केवळ आमीर बरीद या सरदाराच्या हातातील बाहुले बनले. शेवटचा बहमनी सुलतान कलीमउल्लाह हा आमीर बरीद च्या त्रासाला कंटाळून बिदर शहर सोडून पळून गेल्याने बहमनी सत्ता संपुष्टात आली. त्यानंतर दक्षिणेत पाच नवीन सत्ता उदयास आल्या. (बरीदशाही, निजामशाही, आदिलशाही, मोघलशाही, कुतुबशाही) सरदार अमीर बरीद ने या भागावर वर्चस्व प्राप्त करून बिदर येथे '**बरीदशाही**' ची स्थापना केली.

इ.स. १६१९ मध्ये विजापूरचा सुलतान इब्राहिम दुसरा आदिलशाहने बिदरवर आक्रमण करून बरीदशाही सुलतान दुसरा आमीर बरीद याचा पराभव केल्याने या भागात बरीदशाही संपुष्टात येऊन विजापूरच्या आदिलशाहा ची सत्ता आल्याने पुढे कांही काळ या भागावर विजापूरच्या आदिलशाही सरदार मलिक मिरजन चे वर्चस्व होते. इ.स. १६५६ साली दक्षिणेकडील मोगल सुभेदार औरंगजेबाने बिदर जिंकुन या शहराचे झफरबाद असे नामकरण केल्याने हा भूभाग मोगल साम्राज्याचाच भाग झाला. नंतर इ.स. १७२४ ला मोगल दरबारातील वजीर निझाम उल मुल्क याने हैदराबाद येथे स्वतःची सत्ता प्रस्थापित करून **निझाम** हा मोगल राजवटीचा दक्षिणेकडील सुभेदार म्हणून मान्यता मिळवली त्यामुळे १७२४ पासून ते भारत स्वतंत्र होईपर्यंत बिदर हे शहर या निझामाच्या हैदराबाद संस्थानाचा भाग बनून राहिले.

दहाव्या शतकात हिंदू सत्तेमुळे तर नंतर आलेल्या मुस्लीम सत्तेमुळे या भागात अनेक ऐतिहासिक स्थळे, वास्तू निर्माण झालेल्या आहेत. गुरु नानक यांच्या पदस्पर्शा मुळे हे ठिकाण शीख धर्मियांचे हि श्रध्दास्थान बनलेले आहे. या व्यतिरिक्त जिल्ह्यात अनेक नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे आहेत. जिल्ह्याला लाभलेला प्राचीन वारसा आणि इतिहास यामुळे जिल्हा पूर्वीपासून आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. येथे असलेली अनेक प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक धार्मिक, ऐतिहासिक अवशेष ज्यामध्ये प्रामुख्याने जलस्त्रोत, नैसर्गिक वनस्पती, ऐतिहासिक किल्ले, मदरसा, मस्जिद, मंदिर, गुरुद्वारा हे त्याची साक्ष आहेत. जिल्हा चालुक्य, बहामनी व बरीदशाहीचे सत्ताकेंद्र होते. याच जिल्ह्यात वीरशैव लिंगायत धर्माची शिकवण दिली गेली. गुरु नानकांचे पदस्पर्श लाभले म्हणून बिदर जिल्हा हा पर्यटकांसाठी नेहमीच आकर्षणाचे केंद्रबिंदू राहिलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी देश विदेशातून

ISBN: 978-93-5810-881-1

लाखो पर्यटक या भागाला भेटी देत असतात. या भागातील पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने बिदर महोत्सव, कल्याण-उत्सव सारखे कार्यक्रमही राबवले जातात.

जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचे नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक पर्यटन स्थळे असे सर्वसाधारण वर्गीकरण करण्यात येत असले तरी अभ्यासकाला समजण्यास सुलभ होण्यासाठी पर्यटन स्थळाची माहिती हि तालुका निहाय दर्शविण्यात आलेली आहे.

पर्यटन स्थळे:

भौगोलिक दृष्ठीकोनातून जिल्ह्याचा अभ्यासकरता असे लक्षात येते कि, बालाघाटच्या डोगररंगाचा हा प्रदेश असल्याने या भागातील अनेक पर्यटन स्थळावर जिल्ह्यातील भौगोलिक रचनेचा परिणाम जाणवतो. पत्येक पर्यटन स्थळाला धार्मिक महत्व असले तरी कांही पर्यटन स्थळी असलेले भौगोलिक वैशिष्ट्ये त्या पर्यटन स्थळाचे महत्व वाढवतात हे निर्विवाद सत्य आहे. बिदर येथे असलेले गुरु नानक गृरुद्वारा येथे असलेला नानकझिरा, नरसिंहा मादिराच्या गुहेतील पाणी, पापणास येथेल तत्त जवळच असलेले बोटॅनिकल गार्डन, बसवकल्याण येथील चंडकापूर अमृतकुंड, नदीचे संगम क्षेत्र हे नैसर्गिक अविष्कार आहेत. त्यामुळे मानवाचे निसर्गाप्रती असलेल्या प्रेमातून हि पर्यटन स्थळे विकसित झालेली आहेत. या व्यतिरिक्त जिल्ह्यात इतिहासाच्या पाउलखुणा बरोबरच गोर्टा येथील स्मारक, बसवकल्याण येथील अनुभव मंडपमहे आधुनिक काळातील सांस्कृतिक वारसा जपणारे मानवनिर्मित पर्यटन स्थळे या जिल्ह्यात प्रकर्षाने दिसून येतात.

जिल्हातील तालुकानिहाय पर्यटनस्थळाची माहिती खालील प्रमाणे आहे.

तालुका	प्रसिध्द पर्यटनस्थळे
बिदर	बिदरचा किल्ला, महमूद गवान मदरसा, बरीदशाही थडगे, रंगीन महाल, बहमनी थडगे, हजरत खलील उल्लाची चौखंडी, सोला खंबा मस्जिद, चौबारा क्लॉक टॉवर, देव देवा वाणा पार्क, ब्लॅक बक रिसॉर्ट, गुरुद्वारा नानक झिरा साहेब, नरसिंह झिरा गुहा मंदिर, पापनाश शिव मंदिर, चिंतलगेरे
बसवकल्याण	भुईकोट किल्ला, अनुभव मंटप, महात्मा बसवेश्वरांचा १०८ फुटी पुतळा, श्री कमलेश्वरा मंदिर जलसांगवी, उमा महेश्वर मंदिर, उमापूर, शिव मंदिर नारायणपूर, दर्गाह हजरत ताजुद्दीन बाबा शेर-ए-सावर व हजरत खाजा बंदे नवाज गेसू, हुतात्मा स्मारक-गोर्टा, श्री सदानंद स्वामी मठ, श्री बसवेश्वर मंदिर, बसवेश्वर महामने, बाल उद्यान, मोरखंडी, चंडकापूर- अमृतकुंड
भाल्की	किल्ला, मैलार मल्लना मंदिर, कारंजा जलाशय, भातंब्रा किल्ला, संगम
हुमनाबाद	श्री विरभद्रेश्वर मंदिर, माणिकप्रभू मंदिर, राजराजेश्वरी देवी मंदिर, जलसंगी, हळ्ळीखेड
औराद	श्री अमरेश्वर मंदिर,

ISBN: 978-93-5810-881-1

३. बिदर तालुक्यातील पर्यटन स्थळे:

जिल्हातील बिदर तालुक्याचा भूभागावर मध्ययुगीन काळापासून राजसत्तेचे केंद्र निर्माण झाल्याने व या भूभागाला लाभलेली नैसर्गिक सौंदर्यामुळे अनेक पर्यटन स्थळे निर्माण झालेले आहेत. ज्यामध्ये प्रामुख्यांने निसर्गनिर्मित व धार्मिक दृष्टीने महत्वाचे असलेले गुरुद्वारा नानकझिरा साहेब, नृसिंह झिरा गुहा मंदिर, पापनाश शिव मंदिर ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचे बिदरचा किल्ला, बरिदशाही थडगे, रंगीन महाल, बहमनी थडगे, हजरत खलील उल्लाची चौखंडी, चौबारा क्लॉक टॉवर, सोला खंबा मस्जिद, मध्ययुगीन शैक्षणिक केंद्र असलेले महमूद गवान मदरसा नैसर्गिक वनस्पतीने नटलेले देव देवा वाणा पार्क (बोटॅनिकल गार्डन) ब्लॅक बक रिसॉर्ट बरोबरच अनेक लहान मोठे मंदिरे, मज्जीद हे पर्यटकांना आकर्षित करणारे पर्यटन स्थळे आहे.

बिदरचा किल्ला:

रेल्वे स्थानकापासून केवळ २ कि.मी. अंतरावर असलेला बिदरचा किल्ला खूपच आकर्षक व सुंदर असून हा किल्ला वास्तुशास्त्रीय दृष्टिकोनातून हा किल्ला इराणी आणि तुर्की वास्तूशास्त्राचा नमुना



आहे हा किल्ला बांधण्यासाठी तत्कालीन काळात देशातील व विदेशातील कारागिराचा वापर करण्यात आलेला होता. त्यामुळे सर्व वास्तू सुशोभित बनवलेल्या आहेत. सध्य स्थितीला त्यातील अनेक वास्तूंचे काही अवशेष असून काही वास्तूवरील नाजूक कलाकुसर आणि लाकडावरील कोरीव काम पर्यटकाला आकर्षित करते.

बिदरचा किल्ला सर्वप्रथम बाराव्या शतकात चालुक्य राजवंशानी बांधलेला होता त्यामुळे आजही किल्ल्यामध्ये अनेक ठिकाणी हिंदू धर्माचे प्रतीकात्मक कमळासारखे अनेक चिन्ह दिसतात. परंतु तो किल्ला पूर्णतः नष्ट झाला होता. पूर्वीच्या किल्ल्याच्या रचनेवरच इ.स. १४३०मध्ये पहिला सुलतान अहमदशहावली बहमनीने हा किल्ला पुन्हा बांधला. किल्ला बनविण्यासाठी अहमदशहावलीने आपली राजधानी गुलबर्गाहून बिदरला स्थलांतरीत केल्याने दिसून येते.

बिदरच्या पठारावरील सर्वात उंच ठिकाणी हा किल्ला बांधण्यात आलेला असून किल्याला बाजूला कातळ खनून केलेला खोल खंदक तटबंदीच्या चोहोबाजूला आहे. सर्वात बाहेरील तटबंदीच्या भिंती सुमारे १५ मीटर जाड आहेत. किल्ल्यावर शत्रूला नाउमेद करण्यासाठी ३७ बुरुजावरती ३७ मोठ्या तोफा तैनात होत्या. किल्ला १.२१ कि.मी. लांब व ०.८० कि.मी. रुंद असून किल्लाला 7 मोठे प्रवेशद्वार आहेत. मुख्य गेट आणि



ISBN: 978-93-5810-881-1

घुमट दरवाजा पर्शियन शैलीच्या बांधकामाचा नमुना दर्शवितो. प्रवेशद्वाराचा दुसरा दरवाजा, शेरजा दरवाजा, दक्षिणेस फतह गेट, तालघाट गेट, दिल्ली गेट आणि पूर्वेला मांडू गेट आहे. प्रवेशद्वारावरील मुख्य बुर्जाला मुंडा बुर्जू असे म्हणतात. खंदक आणि या भिंती पार करून किल्ल्यात प्रवेश करणे हे शत्रूला अशक्य होते. युद्धाच्या काळामध्ये खंदकामध्ये पाणी भरून ठेवण्यात यायचे आणि त्यावरील लाकडी पूल काढून टाकण्यात यायचे. किल्ल्याला मुख्य प्रवेशद्वाराजवळ दुहेरी तटबंदी व तिहेरी खंदकाचे रक्षक कवच चढवले आहे. शत्रूला सरळ तंटबंदीला भिडता येत नाही असे तीन तीन खंदक आहेत. समजा शत्रू एखादा अडथळा पार करून पुढे गेला तरी दुसरा खंदक हजर. त्यापुढे तिसरा खोल खंदक मग अति उंच तटबंदी यामुळे बिदरचा हा किल्ला बराच मजबूत व अभैद्य असल्याचे दिसून येते. किल्लात प्रवेश करतो तेव्हा मुख्य दरवाजा कललेला दिसतो. सर्जा शेरजा दरवाजा हा मुख्य दरवाजा आहे. दरवाजावर असणारे झरोके, सज्जे अजूनही भक्कमपणे आपली जागा धरून आहेत. सज्जावरून शत्रूच्या अंगावर उकळते तेल सोडण्यात यावे, बंदूकीच्या गोळयांचा गोळीबार करण्यात यावा अशी सज्जाची रचना करण्यात आली आहे. हा पहिला भला भक्कम सर्जा दरवाजा आतून लाकडी पण लोखंडी चिलखत असलेला हा भव्य दरवाजा आपले दिंडी दरवाजा, हत्तीरोधक टोकेरी खिळे असे युद्ध विशेष दाखवत आजही सर्जा दरवाज्याच्या कमानीची शोभा वाढवतो. येथून थोडे पुढे गेल्यानंतर सर्जा दरवाज्याचीच दुसरी कमान दिसते. ज्यावर दोन शरब आकृत्या काढलेल्या दिसतात. या सर्जा दरवाज्याचा दुसरा भाग सुंदर खिडक्यांनी सुशोभित केला गेला आहे. ज्याच्या बाहेरील भिंतीवर चिनी मातीच्या हिरव्या आणि निळया रंगाच्या फरशीवरती सुंदर असे नक्षीकाम केलेले आहे. या सर्जा दरवाजाच्या चारही बाजूंनी देवळया पहायला मिळतात. सर्जा दरवाजाच्या तिरक्या दिशेला कोतवाल दरवाजा आहे. याच दरवाज्यावर त्या काळी कोतवाल कचेरी होती. कोतवालाचा हा महाल इराणी पद्धतीने चिनी मातीच्या फरश्यांवरती नक्षीकाम करून सजवला गेला होता. आजही ते सुदंर नक्षीकाम खिडक्यांच्या कोनाड्यावर आपल्याला पहायला मिळते. येथून आपण आत प्रवेश केलो की, आपला बाह्य तटबंदी व मूळ तटबंदी यांच्यामधील जो खंदक आहे त्या भागात आपण पोहोचतो. तेथून गुबंद दरवाजामधून आपण किल्ल्याच्या अंतर्गत भागात प्रवेश करतो. गुबंद दरवाजा ४५ फूट उंच आहे आणि त्याच्या भिंती २२ फूट जाड आहेत. आजही या दरवाज्याची दारे जशीच्या तशी मजबूत आहेत. असे सांगितले जाते की, किल्ल्याच्या सुरक्षिततेकरिता या दोन दरवाज्यांमध्ये तीन हजार सैनिक तैनात केले गेले होते. गुबंद दरवाजा हा घुमट प्रचंड स्वरूपाची घुमटाकार रचना आहे. याच्या बाजूंनी खिडक्या आहेत. त्यातून प्रकाश येतो. इतकी सर्व सुरक्षा पार केल्यावर आपण येतो किल्ल्याच्या अंतर्गत भागात. सद्यःस्थितीत कर्नाटकच्या पुरातत्त्व खात्याने बिदर किल्ल्याच्या अंतर्गत भागात बाग-बगीच्यांची चांगलीच व्यवस्था राखलेली आहे. गुबंद दरवाज्यातून आपण पुढे गेलो की भारतीय पुरातत्त्व खात्याचे संग्रहालय आहे. याच्या विरुद्ध दिशेला किल्ल्यातील सर्वात सुंदर असा रंगीन महल ही इमारत आहे. पण पुरातत्त्व खात्याने या इमारतीत जाण्यासाठीचा प्रवेश बंद केला आहे. त्याच्या पुढे असलेली हजार कोठी ही इमारत खुली होती परंतु त्यातल्या खोल्या लोखंडी गजाची दारे लावून बंद केल्या होत्या. त्याच्या दोन्ही बाजूला काही तोफगोळे ठेवलेले होते. बिदर किल्ल्यातील तर्केश

महल आणि सोलखंबा मस्जिद या दोन्ही वास्तूंच्या मधोमध पुरातत्त्व खात्याने सुंदर फुलझाडे लावून बागबगीचा तयार केला आहे. बागेसमोरच किल्ल्यात सापडलेल्या जुन्या मूर्त्या ठेवण्यात आले आहेत. किल्ल्याच्या परिसरात बहमनी काळातील स्मारके आणि संरचना आहेत त्या पुढीलप्रमाणे

रंगीन महल: गुबंद दरवाज्यातून आत प्रवेश करताक्षणीच रंगीन महाल दृष्टीस पडतो. या महालात प्रवेश करण्यासाठी आर्किलॉजी ऑफ इंडिया विभागातून प्रवेशपत्र घ्यावे लागते. पण सद्यःस्थितीमध्ये रंगीन महालमध्ये जाण्याचा मार्ग बंद करण्यात आला आहे. या महालाच्या बाहेरील भिंतीवर रंगीत फरशा बसवलेल्या आहेत. इथल्या भिंती अनेक रंगाच्या फरशांनी सजवलेल्या असल्यामुळे या रंगीत फरशा महालाचे नाव सार्थक करतात. सुरुवातीला याला बहामनी शासकांनी उभारले होते. नंतर 16 व्या शतकाच्या मध्यात अहमदशाह बरीदने याची पुनर्बांधणी केली. त्यावेळी कलाकुसर केलेल्या लाकडी खांबांनी महाल सुशोभित करण्यात आला होता. लाकडी छतावर अप्रतिम कोरीव काम असून मध्येमध्ये लाल आणि निळ्या रंगाचा वापर करून नक्षीकाम करण्यात आले होते. हे सज्जातील आणि दालनातील लाकडी खांब हिंदू आणि जैन मंदिराची आठवण करून देतात. हा मराठा वास्तूशास्त्राच्या परंपरेसारखा लाकडी बांधकाम असलेला राजवाडा बांधण्यात आला. यानंतर प्रवेश होतो मुख्य महालात. मोतीकारी कारागिरी असलेले सुंदर नक्षीकाम असलेले छत आणि भिंतीवर काळसर पार्श्वभूमीवर मोती देणाऱ्या शिंपल्याच्या अंतर्भागापासून बनवलेली पुड वापरून मोतीकारी केलेले हे महल किल्ल्यातील सर्वात जुना निवासी महाल आहे. येथे नृत्यगायन होत असे. जनान्यासाठी वरच्या बाजूला सज्जा आहे. तो सहजपणे दिसतही नाही. राजवाड्याच्या तळघरात खोल्या असून ती राजवाड्यातील नोकरदार व पहारेकऱ्यांनी वापरल्या होत्या. नोकरांसाठी वेगळे सोपान, वरच्या मजल्यावर जाण्यासाठी अनेक दालने, अनेक जिने आणि मागच्या अंगणात आहे शाही भटारखाना. पण निजामांनी याला कैदखाना बनवला. रंगीन महालापासून थोड्याच अंतरावर गगन महाल हा एक भव्य निवासी महाल आहे. येथे आवर्जून उल्लेख करावा अशी काही खास बाब नाही. रंगीन महालाच्या समोरच एक ऐतिहासिक वास्तुसंग्रहालय आहे.

सोला खंबा मस्जिद: बिदर किल्ल्याच्या आत सोला खंबा मस्जिद ही एक प्राचीन मस्जिद असून या मस्जिदीचे नाव १६ खांबावरून पडले आहे. जे संरचनेच्या पुढील भागावर आहेत. ही मस्जिद झनाना भिंतीजवळ असल्यामुळे याला 'झनाना मस्जिद' देखील म्हटले जाते. ही मस्जिद फक्त राजघराण्याच्या वापरासाठी होती. ही मस्जिद १४२३-२४ मध्ये कुबिल सुलतान यांनी बांधली होती. ही मस्जिद सुमारे ९० मीटर लांबी आणि २४ मीटर रुंदीची आहे. येथे १६ कमानी आहेत. या मस्जिदीचे छत खांबावर अवलंबून असून त्याच्यावरती छोटे छोटे घुमट आहेत. या घुमटामुळे छताला आधार मिळतो. औरंगजेबाने बिदर जिंकून घेतले होते. त्यावेळी त्याने सोळा खांबी मस्जिदीच्या भिंतीवर लिहून घेतलेला खूतबा आजही आहे. सोळा खंबा ही मस्जिद तुघलक सुलतानांनी बांधलेली दक्षिण भारतातील सर्वात जुनी मस्जिद म्हणून ओळखली जाते. या ठिकाणी जुम्याच्या दिवशी नमाज अदा केला जायचा. बिदर किल्ल्याची काही उत्कृष्ट दृश्येदखील मशिदीच्या किल्ल्यावरून पाहिली जातात.

ISBN: 978-93-5810-881-1

तुर्की महाल / तारकश महाल: बिदर किल्ल्यात सोळा खंबा मस्जिदीच्या शेजारी आणि लालबाग गार्डनच्या दक्षिणेस तारकश महाल आहे. १४ व १५ शतकाच्या दरम्यान बहमनी सुलतानच्या तुर्कीच्या पत्नीसाठी ही बहुमजली इमारत बांधण्यात आली होती. जी दोन बहमनी सुलतानांनी बांधली आहे. अहमदशहा तिसरा आणि महमदशहा तिसरा त्याच्या दुरुस्तीचे आणि पुनर्बांधणीचे काम त्यांच्या बरीदशाही वारसदारांनी हाती घेतले. ते तुर्कीहून आले असल्यामुळे कदाचित त्याला 'तुर्की महाल' हे नाव देण्यात आले असावे. या महालाला ताजी हवा आणि प्रकाश आत येण्याकरिता असंख्य कमानदार खिडक्या आहेत. सद्यःस्थितीत महालाच्या अंतर्गत भागांमध्ये जाण्यासाठी प्रवेश नाही. वरच्या भागाला पायऱ्यापर्यंत जाता येते. ज्यामुळे सोळा खंबा मस्जिदीच्या छतावर जाता येते. तेथे मध्यभागातील मोकळ्या जागेतील हॉलची छत पडलेली आहे. त्याच्यावर असलेल्या कमानीच्या आकाराचे अवशेष अजूनही आहेत.

तख्त महाल/दिवाण-ए-खास/सिंहासन पॅलेस: हे महाल १४२२-१४३६ दरम्यान बहामनी सुलतान अहमद शाह यांनी बनवले होते. याच्या समोरील बाजूस मोठे अंगण आहे. आत जाण्यासाठी भव्य दरवाजा बांधण्यात आला होता. हा महाल पूर्णपणे नष्ट झाला असला तरी बचावलेल्या कमानीचे अवशेष आजही आहेत. एका बाजूला शाही कुटुंबियांसाठीच्या खोल्या आहेत तर दुसऱ्या बाजूला ते दालन ज्याचा वापर दिवाण-ए-खास म्हणून व्हायचा. इतिहासकारांच्या मते, हा सुंदर राजवाडा युद्धकाळात स्फोटक आगीच्या उद्रेकात नष्ट झाला. दिवाणए-खासच्या मागे वालकोटी भवानी मंदिर काही वसाहतींसह आहे.

दिवाण-ए-आम: ही या किल्ल्यातील अजून एक महत्त्वाची वास्तू आहे. सुलतान याच ठिकाणी जनतेला भेटत असे. येथील सिंहासनाची जागा, सरदारांच्या दरबारातील जागा, जनतेला उभे राहण्याची जागा हे सर्व बांधल्यानंतर तेथे केलेला सुरक्षेचा विचार आश्चर्यचकित करतो. फरिश्ताच्या माहितीनुसार जगातले कुठलेही सिंहासन याची बरोबरी करू शकत नव्हते. दिवाण-ए-आम इमारतीवर त्याच्या दरवाज्यावर, भिंतीवर निळ्या मेहंदी रंगाच्या टाईल्स रंगीत फरशांची सजावट होती. आज मात्र त्या फक्त अस्तित्व दाखवतात त्यातील एकच भिंत शिल्लक आहे. बाकीच्या कोसळल्या आहेत.

महमूद गवान मदरसा:



चौबारा वॉच टॉवर आणि बिदरचा किल्ला यांच्या मधोमध असलेली एक सुंदर रचना असलेली महमूद गवान मदरसा ही प्रमुख ऐतिहासिक वास्तूंपैकी एक आहे. हे एक जुने इस्लामिक विद्यापीठ आहे. १५ व्या शतकाच्या उत्तरार्धात बहामनी साम्राज्याचा वजीर महमूद गवान याने हा मदरसा स्थापन केला.



याचे बांधकाम १४७२ मध्ये करण्यात आले. राष्ट्रीय महत्त्वाच्या स्मारकांच्या यादीत या मध्ययुगीन मदरसाचा समावेश आहे. महमद गवान यांनी त्यांच्या स्वतःच्या पैशाने हा मदरसा बांधला होता. या मदरसेच्या तीन मजली इमारत एकेकाळी घुमट्यांसह परिपूर्ण होती. या मदरसेच्या भिंती पवित्र कुराणातील श्लोकांनी रेखाटलेल्या आहेत. या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी छत्तीस खोल्या आणि अध्यापन कर्मचाऱ्यांसाठी सहा खोल्या होत्या. एक लायब्ररी होती. जिथे ३००० पर्शियन पुस्तके ठेवलेली होती. येथे एक हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची सुविधा होती. महमूद गवान यांना ही मदरसा जागतिक दर्जाची बनवायची होती. दुर्दैवाने १६९५ मध्ये बारुदाच्या विस्फोटामुळे तोफा आणि दारूगोळयांमुळे इमारतीचे नुकसान झाले. याच मदरसेमध्ये महमद गवान मस्जिद आहे. इथल्या भिंती रंगीत टाईल्सनी सुशोभित होत्या. मीनारावरती विटांचे आडवे तिडवे पॅटर्न आणि त्यांना हिरव्या, निळया, पिवळया रंगांनी सजवले गेले होते. विदेशी पर्यटक या मदरसेमध्ये विशेष रुची घेतात. यावरून असे आढळून आले की, बिदरचा किल्ला केवळ लष्करी वास्तू नव्हती तर ते एक शिक्षण आणि संस्कृतीचे केंद्र होते.

अष्टूर येथील बहमनी थडगे :

बिदर रेल्वे स्थानकापासून 5.5 कि.मी. अंतरावर अष्टूर येथे बहमनी थडगे किल्ल्यानंतर ही एक महत्त्वाची वास्तू आहे. बहमनी सुलतानाच्या 12 धडग्या याच कंपाऊंडमध्ये आहेत. त्या सुंदर कमानी उदंड घुमट असलेल्या विशाल संरचना आहेत. या सर्व थडग्यांपैकी अहमदशाह वली या सुलतानाची थडकी सर्वात लोकप्रिय आहे. ख्वाजा बंदेनवाझ या सुफी फकिरचा अहमद शाह हा सुलतान निःस्सीम भक्त होता. ख्वाजा बंदे नवाझ यानीच या सुलतानाला 'वली' हा किताब बहाल केला होता. अहमदशाह वलीने बहमनीची राजधानी गुलबर्गाहून बिदरला हलवली होती. इ.स. १४३० मध्ये त्याने जुना किल्ला पुन्हा तयार केला. अहमदशाहावली हा सुफी संताचा आश्रयदाता असल्यामुळे त्याला देखील पीर म्हणून लोकांकडून आदर मिळायचा. बिदरमधील अष्टूर याठिकाणी अहमदशाह वली यांचा मकबरा आहे. दरवर्षी हिंदू आणि मुसलमान येथे अहमदशाहाचा उरूस साजरा करायला येतात. असे सांगितले जाते की, अहमदशाहा ज्यावेळेस शासक होते त्या काळात १५ व्या शतकामध्ये बिदरमध्ये दुष्काळ पडला होता. पाऊस नव्हता. तेव्हा अहमदशाहाने पावसासाठी ईश्वराला प्रार्थना केली होती. तेव्हा बिदरमध्ये खूप मोठा पाऊस पडला. तेव्हापासून अहमदशाहाचा दर्जा बादशहापेक्षा संत म्हणून प्रसिध्द झाला. अहमदशाहाचा उरूस दरवर्षी मार्च महिन्यामध्ये साजरा केला जातो. अहमदशाहाच्या मकबऱ्याच्या आतल्या भिंतीवर कुराणातली वचने सोने वापरून लिहिले आहेत. दूसरा असाच लक्षवेधक मकबरा सुलतान अल्लाउद्दीन शाह (दुसरा) याचा आहे.

ISBN: 978-93-5810-881-1

सुलतान अल्लाउद्दीन शाह (दुसरा) यांचे थडगे/कबर: याच्या कबरीवर स्वास्तिक चिन्ह काढलेले आहे ज्यामध्ये कमानीच्या काळ्या दगडाच्या फरशावर कोरीवकाम केलेले आहे जे अतिशय प्रभावी आहे. हा अहमदशाह वलीचा एक विचारवंत सुसंस्कृत राजपुत्र होता. 1458 मध्ये सुलतान अल्लाउद्दीन शाह जखमी झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. हे थडगे अहमदशाहा वलीच्या थडग्याच्या शेजारी आहे.

अल्लाउद्दीन शाहचा मुलगा हुमायून शाह याचे थडगे/कबर: हा मकबरा पडक्या अवस्थेत आहे. त्याचा घुमट आणि एक बाजू पूर्णपणे पडलेली आहे. या पडक्या भिंतीतून आपल्याला मकबऱ्याच्या आतून आकाश दिसते. स्थानिक कथा असे सांगते की, हा सुलतान हुमायून अतिशय क्रूर असा शासक होता. त्याने तीन वर्षे राज्य केले. त्याच्या कारकिर्दीत त्याने लोकांना खूप त्रास दिला होता. त्यामुळेच त्याच्याच मकबऱ्यावर वीज पडून त्याची ही भग्नावस्था झाली आहे.

मलिका-ए-जहानचे थडगे: दक्षिण पश्चिमेस हुमायूनच्या थडग्यापर्यंत त्यांची पत्नी मलिका-ए-जहानचे थडगे आहे. तिची अल्पवयीन मुले मोहम्मद शहा आणि निजामशाह यांच्या कारकिर्दीत तिने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

निजामशाह थडगे: हे थडगे मलिका-ए-जहान यांनी बाधले होते. हे हुमायून थडग्याच्या शेजारी आहे. कारण हा त्याचा मुलगा होता. हे थडगे अकल्पितरित्या अपूर्ण राहिले. त्याची घुमट हरवलेल्यासह उघडी आहे.

मोहम्मद शाह तिसरा आणि मोहम्मद शाहा चौथा यांचे थडगे: निजामशाहाच्या शेजारी मोहम्मदशाह तिसरा यांची कबर आहे. त्याचे थडगे अपूर्ण असल्यामुळे मोहम्मदशाहा चौथा यांनी स्वतःचे थडगे बांधले. भिंतीवर कमानी असलेले थडगे भव्य आहे. महमूदशाह चतुर्थ याच्या कबरेच्या दक्षिणेस व पश्चिमेस मोहम्मदशाह चतुर्थ यांचे नामदार उत्तराधिकारी त्यांचे पुत्र अहमद विरा शाह दुसरे, अल्लाउद्दीनशाह द्वितीय आणि त्यांची मुले वली उल्लाशाह आणि कालीमउल्लाशहा है बरीदशाहीच्या ताब्यात होते. हे सर्व चारही थडगे शंकूच्या आकाराचे घूमटाकार आहेत. इथेच एक छोटी मस्जिद आहे.

महमूद गवानची कबर: महमूद गवान हा बहमनी राज्याचा वजीर आणि उत्तम प्रशासक होता. त्याने राज्यकारभारात हिंदू-मुसलमान असा भेदभाव केला नाही. योग्य गुणी कार्यकुशल लोकांना संधी देऊन अधिकारपदे बहाल केली. राजकीय विस्तार आणि प्रशासकीय सुधारणा घडवून आणली. सांस्कृतिक क्षेत्रात विकास केला. तसेच जमीन महसूल व्यवस्था सुधारून राज्याला आर्थिक सामर्थ्य प्राप्त करून दिले. सैनिकाना जहागिरीऐवजी रोख पगार देऊन सैन्यात शिस्तबद्धता आणली. महमूद हा विद्याप्रेमी होता. त्याला गणित आणि वैज्ञानिक विषयातील ज्ञान होते. त्याने बिदर येथेच अरबी आणि फारसी विद्याच्या अभ्यासासाठी मदरसा स्थापन केली होती. महमूद गवानच्या कारकिर्दीत बहमनी राज्य भरभराटीस आले होते. एकेकाळचा हा बिदरचा सर्वेसर्वा बादशहाचा प्रामाणिक नेक कर्तबगार सरदार होता. गावापासून दूर अजिबात वावर नसलेल्या एका आजूबाजूच्या वावरात महमूद गवानची कबर आहे. अगदी साधी

कोणाला माहिती ही नाही. महमूद गवान हा एक कुशल प्रशासक होता. वजीर पदापासून त्याला झपाट्याने बढती मिळत गेली. त्यामुळे दरबारातील सहकाऱ्यांमध्ये त्याच्याप्रती ईर्ष्या निर्माण झाली आणि त्यांनी त्याला खाली खेचायला कट रचला. त्यानी महमूद गवान याला खोट्या आरोपाखाली फसवले आणि बादशहाला सांगून मृत्यूदंड द्यायला लावले. बिदरच्या अधःपतनाला तेव्हापासूनच सुरुवात झाली. या सर्व थडग्याच्या/मकबऱ्यांच्या देखरेदखीची जिम्मेदारी एका काळामध्ये हैदराबादचा निजाम मीर उस्मान अली खान यांच्याकडे होती. आज हे मकबरे आर्किलॉजिकल सर्वे ऑफ इंडियाच्या अधिन संरक्षित स्मारकाच्या स्वरूपामध्ये आहेत. कर्नाटक सरकारने या सर्व वास्तूंचे उत्तम जतन केले आहे.

हजरत खलील उल्लाची चौखंडी: बिदरमधील अष्टूर येथे हजरत खलील उल्लाची चौखंडी आहे. हे स्मारक बिदरमधील प्रमुख ऐतिहासिक वास्तूंपैकी एक आहे. हे ठिकाण बिदर रेल्वे स्थानकापासून ५ कि.मी. आणि बहमनींच्या थडग्यापासून १ कि.मी. अंतरावर आहे. ही हजरत खलील उल्लाच्या स्मरणार्थ बांधलेली समाधी 'चौखंडी' या नावाने प्रसिद्ध आहे. हा एक सुंदर दर्गा असून ही एक प्राचीन भव्य अष्टकोनी इमारत आहे. हा दर्गा फार प्राचीन आहे. आत 'पीर' आहे. आतून साठ ते सत्तर फूट उंच सिलिंग आहे. आणि त्यावर घुमट आतमध्ये बाहेरचा प्रकाश दिसेल अशी रचना बनवलेली आहे. मुख्य दरवाज्याच्या भोवती आणि भिंतीना वेगवेगळया रंगाच्या रत्नाचे सुंदर नक्षीकाम आजही आपल्याला पहायला मिळते. बाहेरून अष्टकोनी दगडावरती पुराणातील श्लोकाचे शिलालेख सुशोभित केलेले दिसतात. चौखंडी या दर्यावर सगळयाच धर्माच्या लोकांची नितांत श्रद्धा आहे. इथे लोक प्रार्थना करायला येतात. दुवा मागतात. आत दिवा लावतात, उद लावतात. इथे नित्य-नियमाने पूजा-अर्जा केली जाते. ही अष्टकोनी इमारत अली शाहा यांचे धार्मिक गुरक हजरत खलील उल्लाच्या आठवणीत बनवलेला आहे.

बरीदशाही थडगे/मकबरे (बरीदशाही पार्क): बरीदशाही पार्क याठिकाणी बरीदशाही थडगे आहेत. हा पार्क डेक्कन पार्कच्या समोरील रस्त्याच्या दुतर्फा आहे. या ५५ एकर असलेल्या बागेत शेकडो झाडे आहेत. मुख्य प्रवेशद्वाराच्या दक्षिणेकडे एक प्रवेशद्वार आहे जे तारांच्या आकाराचे पॅनेल्स बसवून आर्किटेक्चरल आकृतिबंधानी सजवलेले आहे. दक्षिण भारतात बहमनी साम्राज्याच्या विघटनानंतर कर्नाटक राज्यातील बिदर येथे स्थापन झालेली एक शाही म्हणजेच बरीदशाही. या बरीदशाहीचा संस्थापक कासिम बरीद ऊर्फ बरीद उल मलिक (कारकिर्द १४९०-१५०४) हा होय. हा शिलाबुद्दीन महमूदशाह बहमनी (काळ १४८२-१५१८) यांच्या कारकिर्दीत मुख्य वजीर होता. (काळ १५०४-१५४२) मध्ये कासिम बरीदचा मुलगा अमीर अली बरीद हा मुख्य वजीर झाला. बहमनी सत्ता वजीराकडेच होती. १५२७ नंतर आमिर बरीद स्वतः स्वतंत्र बादशहा घोषित होते व बहमनी सत्ता आटपून बरीदशाही सत्ता बिदरला स्थापन झाली होती.

बरीदशाही थडगे/मकबरे (बरीदशाही पार्क):

बरीदशाही पार्क बारिदी टोम्स येथे बरीदशाही राजवंशातील सुलतानाची मकबरे आहेत. अली बारीदशा हा बरीदशाही राज्यकर्त्यांपैकी सर्वात प्रमुख होता. त्यांना आर्किटेक्चरमध्ये आवड होती. त्यांनी स्वतःच्या

मृत्यूच्या तीन वर्षे अगोदर स्वतःचे थडगे बांधले. या मकबऱ्याची निर्मिती १५ व्या शतकामध्ये करण्यात आली होती. अली बरीदशाही यांचा मकबरा हा इस्लामिक वास्तूकलांचे आणि सौंदर्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. ही ७० फूट उंच कबर असून चार खांबावर आधारित मोठा घूमट आहे. घुमटाच्या आतून देखील फरशा रंगवलेल्या आहेत. पेंटिंगमध्ये निळया रंगानी सुंदर डिझाईन काढलेले आहेत. या मकबऱ्याच्या दगडावर फुलांच्या डिझाईन्स कोरून काढलेल्या आहेत. मकबऱ्यावरती हिरव्या ग्रॅनाईट आणि लॅटेराइट खड्याने बांधलेला हा उंच प्लॅटफॉर्म आहे. या मकबऱ्याजवळ अली बारीद आणि त्यांचा बायका याचे थड़गे आहेत. थडग्याजवळ एक छोटीशी मशीददेखील आहे.

डेली पार्कच्या विस्तीर्ण भागामध्ये अली बारीद आणि त्याचा मुलगा कासिम बारीद यांचे थडगे आहेत. पार्क गेटवेच्या पलीकडे कासीम बरीदशहा दुसरा याचे थडगे आहेत. हे थडगे/मकबरे बिदरमधल्या प्रत्येक वास्तू स्थापत्यशास्त्राची महती सांगणारी अशीच आहे. खरं तर थडगे म्हणजेच कबर असलेली जागा त्याला अमंगल मानले जाते. पण या ठिकाणी गेल्यानंतर येथील वास्तूशास्त्रीय कला पाहून मनाला स्पर्श मंगलता नक्कीच आहे. हे इथे गेलेला पर्यटक प्रत्यक्ष अनुभवतो.

चौबारा घड्याळ टॉवर:



बिदरमधील हे एक महत्त्वाचे स्मारक आहे. चौबारा म्हणजे चार दिशांना तोंड असलेली दंडगोलाकार टॉवर बांधलेली इमारत होय. हिंदी आणि पर्शियन भाषेचा उपसर्ग या चार दिशांचा अर्थ दर्शवितो. तर पर्शियन भाषेत 'बारा' म्हणजे सदृढ ठिकाणी म्हणजेच हिंदीमध्ये घर. चौबारा हे अगदी दाट लोकवस्ती असलेल्या क्षेत्राच्या मध्यभागी आहे. जेथे बिदरचे दोन मुख्य रस्ते एकमेकांना ओलांडतात. त्यातला एक रस्ता हा बिदरच्या किल्ल्यापासून फतेह दरवाजापर्यंत विस्तारलेला आहे आणि दुसरा मंगलपेट शाह गुंज दरवाजाला जोडतो. बिदरच्या देखरेखीसाठी हा चौबारा बांधण्यात आला होता. टॉवरच्या वरून संपूर्ण बिदरचा नजारा दिसतो. राज्यकर्त्यासाठी शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी चौबारा टॉवर हा एक जणू पहारेकरीच असल्यासारखा होता. चौबारा टॉवरच्या दंडगोलाकार रचनेवरून संपूर्ण बिदर शहराचे आणि खाली दिशेने पसरलेल्या खालच्या जमिनीचे दृश्य दर्शविते.



चौबाऱ्याची संपूर्ण रचना सुंदर असून ते सर्वात मोठ्या आकारांचे पश्चिम एशियाटिक देशातील काही मस्जिदींच्या मनोऱ्यासारखेच आहे. या चौबाऱ्याच्या संरचनेच्या पृष्ठभागाच्या आतील बाजूस पायऱ्या बांधलेल्या आहेत. या ८० पायऱ्या टॉवरच्या माथ्याकडे जातात. या चौबाऱ्यातील शिखर तळघर ५३ फूट उंच आहे. तसेच टॅरेस स्तरावरील टॉवरचा घेर ११४ फूट आहे आणि वर पायाने जाता यावे त्यासाठी

ISBN: 978-93-5810-881-1

सभोवताली एक जागा सोडलेली आहे. परिघात १८० फूट आणि उंची १६ फूट त्याच्या खालच्या बाजूने लहान कमानी बांधलेल्या आहेत. टॉवरच्या माथ्यावर एक मोठे घड्याळ आहे. टॉवरला चार आयताकृती खुल्या आहेत. ज्यामुळे भिंतीवर प्रकाश येऊ शकतो आणि हवा खेळती राहते.

देव देवा वाणा पार्क (बोटॅनिकल गार्डन):

बिदर रेल्वे स्थानकापासून 5.5 कि.मी. अंतरावर बिदरमधील शाहपूरजवळील देव देवा वाणा ही पार्क कर्नाटकामधील सर्वात मोठ्या बोटॅनिकल उद्यानांपैकी एक आहे. देव देवा वनम सुमारे 500 चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेले आहे. हा शाहपूर रिझर्व्ह जंगलाचा एक भाग असून याला इकोटुरिस्ट स्पॉट म्हणून विकसित केलेले आहे.



या उद्यानात पंचवटीवना, अशोक वाणा, राशी वाणा, नवगृह वाणा अशी नावे येथील औषधी वनस्पतींना देण्यात आली आहेत. वाणा हा एक संस्कृत शब्द आहे. ज्याचा अर्थ वन आणि देव म्हणजे दैवी प्राणी होय. येथे १० बागा आहेत आणि एक रोपवाटिका आहे. गुलाब बाग, औषधी नर्सरी, रॉक गाउर्न, नवगृह वाणा, नंदना वाणा, राशी वाणा, शिव पंचायती वाणा, ब्रहात पचवटी वाणा, अशोक वाणा, फला पुष्पा वाणा या बागा आहेत. कालिदासाने मंगलाष्टक ग्रंथात नंदनाचे वर्णन केलेले आहे. त्यावरून नंदना वाणा हे बागेचे नाव पडले आहे. तर या बागेत हवा शुद्ध करणाऱ्या फुलांच्या दहा प्रकारची झाडे आहेत जी फळे व फुले देतात. श्रीलंकेच्या राजधानीमध्ये अशोक बाग होती. रावणाने सीतेला अशोक वनामध्ये ठेवले होते तेथे सीतेचे दुःख दूर करणाऱ्या लता होत्या. तशाच या बागेत अनेक बहुउद्देशीय औषधी व दुःख दूर करणाऱ्या लता आहेत. त्यामुळे याला अशोकावना हे नाव देण्यात आले आहे.



शिव पंचायती वाणा हे शिवाला समर्पित आहे. शिव हा मुख्य असून त्याच्यामुळे निसर्ग, पृथ्वी, प्राणी, अग्नी, वायू, आकाश बनलेले आहे असे मानले जाते. त्यामुळे या वनात बेलपत्रींचे वृक्ष

ISBN: 978-93-5810-881-1

मोठ्या प्रमाणात आढळून येतात. या ठिकाणी अनेक बाबूंची झाडे, मुलूगा, अरळी, खादिरा, गरिके, धारबा आणि उत्तराणी या वनस्पतीचे नवग्रहासंबंधित नावे आहेत. त्यावरून या वणाला नवग्रह वाणा हे नाव पडले आहे. तसेच गोलाकार भिंतीत चार झाडे असून त्याला ब्रह्म पंचवटी वाणा असे नाव आहे. मध्यभागी कडूलिंबाचे एक झाड आहे. उद्यानाच्या अर्ध्या भागामध्ये झाडे आहेत. त्यामुळे चालायचा मार्ग फारच अवघड आहे. या जंगलातून काही प्रवाह वाहतात. पूर्वी त्याठिकाणी लाकडी पूल होता. तो बदलून नवा लोखंडी पूल बांधण्यात आला आहे. या उद्यानात रेस्टॉरंटसह एक लहान हॉटेल आहे. रात्रभर मुक्काम करण्यासाठी इको- झोपड्या आहेत. हे पार्क बुधवारी बंद असते. या उद्यानामध्ये २०० पेक्षा जास्त औषधी वनस्पती आहेत. याठिकाणी मुलांसाठी प्ले एरिया आहे. त्यामुळे ही पर्यटक याठिकाणी सुट्टीच्या दिवसात आपल्या कुटुंबियांसोबत आणि मित्रांसोबत या ठिकाणी येतात.

ब्लॅक बक रिसॉर्ट:

बिदरच्या रेल्वे स्थानकापासून १९ कि.मी. अंतरावर ब्लॅक बक रिसोर्ट हे जंगल रिसार्टस आणि लॉज कर्नाटक सरकारच्या देखरेखीखाली असलेल्या सर्वोत्तम जंगल रिसॉर्टपैकी एक आहे. हे रिसार्ट होनिकेरी रिझर्व्ह जंगल आणि विलासपूर तलावाच्या दरम्यान आहे. या रिसॉर्टचे नाव ब्लॅर्क बक्स वरून पडले आहे. या लॉजसाठी ४ एकर जागा वापरण्यात आलेली आहे. याठिकाणी हे रिसॉर्ट हिरव्यागार गवताने वनस्पती आणि प्राण्यांमध्ये विपूल आहे. याठिकाणी लांडगे, कोल्हे, काळे नेपेड, ससा, रानडुक्कर, मोर, जंगली मांजरी आणि हरणांची झलक दिसते. लाल रंगाचे बुलबुल, रॉबिन्स, कबूतर हे पक्षी आढळतात. या रिसोर्टमध्ये एक तलाव आहे ज्यामध्ये बोटिंग करता



येते. या रिसॉर्टमधील वन्यजीव पाहण्यासाठी फोटो काढून घेण्यासाठी या ठिकाणी पर्यटक येतात. या रिसॉर्टमध्ये १८ कॉटेज आहेत. सर्व कॉटेज प्रशस्त असून वातानुकूलित आहेत. त्या कॉटेजमधील आतील भाग थंड ठेवण्यासाठी वरती छप्पर आहेत.


ISBN: 978-93-5810-881-1

गुरुद्वारा गुरुनानक झिरा साहिब:

बिदर रेल्वे स्थानकापासून २ कि. मी. अंतरावर गुरुद्वारा नानक झिरा साहेब हे एक बिदरमधील ऐतिहासिक धार्मिक स्थळ आहे. हा गुरुद्वारा १९४८ मध्ये बांधलेला असून गुरुनानक यांना समर्पित आहे. गुरु नानकजी यांचा जन्म कार्तिक पौर्णिमा १५२६ मध्ये ब्रिमी येथील तलवंडी रायभोई येथे झाला. जे आता श्रीनानकाना साहेब (आता पाकिस्तानमध्ये) आहे. असे सांगितले जाते की, शिखांचे पहिले गुरु नानकदेवजी हे भगवान अवतार होते. त्यांच्या जन्मापूर्वी जगात पाप, अन्याय अत्याचार या वाईट गोष्टी मोठ्या प्रमाणावर पसरल्या होत्या. त्या काळात पंजाबची परिस्थिती आणखीनच वाईट होती. पंजाबमध्ये एकता नव्हती. आक्रमकता, लूटमार, अशांतता होती. अशा काळोख काळात गुरु नानक देवजी महाराज प्रेम, समानता, एकता, चांगुलपणा, मानवतेची सेवा करण्यासाठी सत्याचा विजय करण्यासाठी देव स्वतः पवित्र व्यक्तीच्या रूपात जन्माला आले.



गुरुद्वारा गुरुनानक झिरा साहिब नानकझिरा: इ.स.१५१० ते १५१४ च्या दरम्यान गुरुनानक दक्षिण भारत दौऱ्यावर गेले असता नांदेडला नर्मदेवरील ओंकारेश्वराच्या हिंदू मंदिराला भेट देवून नांदेडप्रमाणे गोवळकोंडा येथे गेले आणि हैदराबादच्या दिशेने जाऊन मुस्लिम संतांना भेटले. तेथून बिदर येथील याकूब अली आणि पीर जलालुद्दीन यांना भेटायला ज्या ठिकाणी आले होते, ज्या ठिकाणी बसले होते ते ठिकाण आता असलेले गुरुद्वारा आहे. ज्यावेळी गुरुनानकजी बिदरला आले होते. त्यावेळेस



बिदरमध्ये पाण्याची तीव्र कमतरता होती. विहिरी खोदल्या तरी पिण्याचे पाणी अनुपयुक्त होते. पिण्याच्या पाण्याची अशी स्थिती पाहून गुरुनानक दुःखी झाले. त्यांनी तेथील एक दगड हलविला. दगडाखालून पाणी वाहू लागले. ती

ISBN: 978-93-5810-881-1

जागा नानकझिरा (झिरा प्रवाह) म्हणून ओळखली जाऊ लागली.

अमृतकुंड: नैसर्गिक वसंत गुरुनानक देवजीने ज्या ठिकाणी दगड घालवून पाणी काढले होते ते पाणी थंड आणि गोड पिण्याचे पाणी आहे ज्याला नानकझिरा म्हणून ओळखले जाते. हे पाणी अमृतासारखे गोड आहे असे मानले जाते. पांढऱ्या संगमरवरी व काचेच्या संरक्षणाद्वारे सर्वांना स्पष्टपणे स्वच्छ पाणी दिसेल अशी रचना ज्या कुंडामध्ये बांधली आहे ते अमृतकुंड म्हणून ओळखले जाते. याचे पाणी गुरुद्वाराच्या पुढच्या पाऱ्यांसमोर बांधलेल्या एका लहान तलावामध्ये गोळा केले जाते. लोक या कुंडातील पाणी तीर्थ म्हणून पितात. बाटलीत भरून तीर्थ म्हणून घरी घेऊन जातात. या कुडातील पाण्याने त्वचेचे रोग बरे होतात. असाध्य आजारांपैकी रोग बरा होतो असे सांगितले जाते.

लंगर: शीख धर्मात स्वयंपाक घराला लंगर म्हटले जाते. लंगर हे गुरुद्वारामधील सामुदायिक स्वयंपाकघर आहे. लंगर दररोज भाविकांना मोफत जेवण देते. येथे सर्वजण मदत करू शकता, सेवा करू शकतात. येथे कोणत्याही जातीचा, धर्माचा व्यक्ती एकत्र बसू शकतो. शीख धर्माची एक प्रमुख शिकवण म्हणजे 'वंड छको' (विभाजन करा आणि खा) लंगरचा हा व्यावहारिक प्रकार आहे. गुरुनानकजी यांनी त्यांच्या अनुयायाना तीन सूचना दिल्या होत्या 'नाम जपो, किरत करो, वंद छाको' (देवाच्या नावाने चिंतन करा, कठोर परिश्रम करा आणि तुम्ही जे खात आहात ते सामयिक करा) गुरुनानक यांनी लंगरमध्ये एकत्रितपणे अन्न खाण्यास महत्त्व दिले. लंगर परंपरा १५ व्या शतकात सुरु झाली. गुरुनानक देवजी त्यांच्या बाला-मर्दानासोबत राहत असताना जिथे ही जायचे तिथे जमिनीवर बसून जेवण करण्याची येथे प्रथा आहे. लंगरमध्ये जेवण सेवेच्या माध्यमातून दिले जाते. भांडी धुवून एका निर्दिष्ट ठिकाणी ठेवली जातात.

दरबार साहिब-दिवाण हॉल: शीख गुरुद्वारामधील हा एक मुख्य हॉल म्हणजे दरबार साहिब होय. याठिकाणी मुख्य मध्यवर्ती स्थानात सिंहासनावर पवित्र ग्रंथ, गुरुग्रंथसाहिब जी ठेवलेले आहे.

दरबार साहिब पूजा दिवाण हॉल (प्रार्थना हॉल) मध्ये लोक गुरुग्रंथ साहिबमधील पूजा भजन गातात. एखाद्या वस्तूकडे पाय होऊ नये म्हणून महिला आणि पुरुष दिवाण हॉलच्या विरुद्ध बाजूला बसतात. पारंपरिकरित्या येथे मिश्र पद्धतीने बसण्यास मनाई आहे. गुरुग्रंथसाहिब उशावर ठेवलेले आहे जे उंच व्यासपीठावर ठेवलेले आहे. ज्याच्यावर सुंदर कपड्याची वस्त्रे आहेत.

रोमाका नावाचे कापड गुरुग्रंथसाहिब वाचत नसताना झाकून ठेवतात. हे दिवाण हॉलच्या समोर आहे. दिवाण हॉलमध्ये आणखी एक व्यासपीठ आहे ज्याला रागी म्हणतात. जेथे संगीतकार आणि वाद्य वाजवतात. गुरुचे स्रोत गातात, गुरुचे शब्द गातात.

गुरुद्वारातील पवित्र पुस्तक: 'गुरुग्रंथसाहिब' हा शीख धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. यात गुरु नानकांचे शब्द, स्रोत आहेत. ज्यात प्रमुख प्रार्थना जपजी साहिब (जाप, पठण करणे) आहे. या ग्रंथातला साहिब हा प्रत्यय आदर दर्शवितो.

ISBN: 978-93-5810-881-1

शीख संग्रहालय: या शीख संग्रहालयामध्ये शीख धर्माशी संबंधित असलेल्या घटना मुख्य लोकांचे योगदान दर्शविले आहे.



प्रकाशयात्रा: दरवर्षी कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यापासून महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्ह्यापर्यंत प्रकाशयात्रा काढली जाते. संपूर्ण देशातून भक्त या प्रकाशयात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी येतात.

गुरुद्वारा उत्सव: नोव्हेबर महिन्यामध्ये गुरुनानक देवजी यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहामध्ये साजरा केला जात असतो. या उत्सवामध्ये स्वयंसेवक गुरुद्वारा स्वच्छ करतात. स्वयंपाकघरात (लंगर) मदत करतात. गुरुद्वारा विशेषतः झेंडे, बॅनर, दिवे, लायटिंग लावून सजवतात. या उत्सवानिमित्त मोठमोठे कार्यक्रम घेतले जातात. कार्यक्रमामध्ये शीख धर्मातील गुरुनानक देवच्या कथा सांगणाऱ्यांना बोलावले जाते. बिदर हे शीख यात्रेसाठी एक पवित्र स्थान आहे.

श्री क्षेत्र झरणी नृसिंह मंदिर:



बिदर शहरापासून ४.८ कि.मी. अंतरावर हे नृसिंह झरणी गुहा मंदिर असून हे मंदिर मनिचुला डोंगराच्या रांगेत ३०० मीटर बोगद्याने खोदले गेले आहे. भगवान विष्णूचा चौथा अवतार भगवान नरसिंह म्हणजे अर्धा मनुष्य अर्धा सिंह. हे प्रसिद्ध गुहेचे मंदिर नृसिंह गुहेच्या शेवटी भिंतीवर विराजमान असून हे एक वास्तूशिल्प आहे. या गुहेच्या शेवटी गर्भगृह आहे. ज्याठिकाणी एक शिवलिंग आहे. ज्याचे झारसुरा (जलसूरा) राक्षस उपासना करीत होते. याठिकाणी भगवान नृसिंहाच्या बाजूला कमी जागा असल्यामुळे तेथे सात ते आठ लोक उभे राहून पूजा करू शकतात. बाकी इतर व्यक्तींना पाळीने थांबावे लागते. या गुहेमध्ये पाणी सतत वाहत असते. लोक त्यात चालतात. असे सांगितले जाते की, या पाण्यामध्ये आंघोळ केल्यामुळे त्वचेशी संबंधित असलेले रोग बरे हातात. या पाण्यातून नृसिंह देवाच्या दर्शनासाठी लहान मुलांना लोक खांद्यावर घेऊन जातात. गुहेत जाताना पाण्याची उंची ४ फूट ते ५ फूट असते. या गुहेतील लेण्यांच्या छतावर वटवाघूळ पक्षी आहेत जे बोगद्याच्या पलीकडे उडताना दिसतात. जे भिंतीला चिकटून छतावर टांगलेल्या सारखे दिसतात. आजपर्यंत या वटवाघळांनी कोणालाही इजा केलेली नाही. या गुहेत जाताना लोक 'गोविंदा गोविंद गोविंद नरसिह हरी' असे शब्द उच्चारतात.



झारसुरा (जलासुरा) नावाच्या राक्षसाने आपल्या नखाने गुहेचे खोदकाम करून येथील लेण्यांना मोहक केले होते. भगवान शंकराची उपासना, ध्यान-आराधना करण्यासाठी झारसुरने ही गुहा तयार केली होती. बिदरमधील ज्या ठिकाणी आता नृसिंहाचे मंदिर आहे त्या गुहेच्या भिंतीवर झारसुराच्या नखांच्या खुणा अद्याप दिसतात. हा झारसुरा (जलासुरा) राक्षस पशूपक्षी, प्राणी, कीटक, मनुष्य मारून खायचा. ते कच्चे मांस खायचा आणि हाडे काढून बाजूला फेकत असे. बिदरचे लोक घाबरून गेले. पौराणिक कथा असे सांगते की, नृसिंहाने हिरण्यकशिपूला ठार मारल्यानंतर झारसुरा (जलासुरा) नावाच्या राक्षसाला ठार मारले. जो भगवान शिवाचा कट्टर भक्त होता. या राक्षसाने त्याचा शेवटचा श्वास घेताना नृसिंहाला शेवटची इच्छा मागितली की, मी तुमच्या चरणी नतमस्तक आहे. तुम्ही या गुहेत रहा. तुमच्या नावाच्या पुढे माझे नाव यावे असे वरदान मागितले. त्यानुसार नृसिंह गुहेत रहायला आले. या गुहेतील लेण्याच्या शेवटी एका दगडाच्या भिंतीवर नृसिंहाची प्रतिमा कोरलेली आहे. नृसिंहाने जलासुराचा वध केल्यावर असे सांगितले जाते की, हा राक्षस पाण्यामध्ये बदलला आणि भगवान नृसिंहाच्या पायाजवळ खाली वाहू लागला. तेव्हापासून या लेणी बोगद्यात पाण्याचा प्रवाह सतत वाहत असतो तो कधीच कोरडा पडला नाही.

असे सांगितले जाते की, या गुहेतील नृसिंह हा देव स्वयंभू रूपम असून तो शक्तिशाली आहे. हा भगवान नृसिंह भक्ताच्य इच्छा-आकांक्षा पूर्ण करतो. त्याना वरदान देतो. त्यामुळे लोक छातीएवढ्या पाण्यातून ओल्या अंगाने दर्शनासाठी जातात.

पापनाश शिव मंदिर:

पापनाश शिव मंदिर हे बिदरमधील बिदर रेल्वे स्थानकापासून ४ कि.मी. अंतरावर असलेले एक धार्मिक पर्यटनस्थळ आहे. हे मंदिर भगवान शिव (महादेव) यांना समर्पित आहे. या मंदिराच्या पायथ्याशी एक तलाव आहे जो सतत नैसर्गिक धबधब्याद्वारे वाहत असतो. हा तलाव पापनाश या नावाने ओळखला जातो. असे सांगितले जाते की, या तलावातील पाण्याने आंघोळ केल्यास मनुष्याच्या सर्व पापांचा नाश होतो. त्यामुळे याठिकाणी येणारे सर्व श्रद्धाळू या पवित्र तलावात स्नान करतात.

पौराणिक कथेनुसार भगवान श्रीराम लंकेवरून रावणाचा वध करून अयोध्येकडे जात असताना भगवान रामाने बिदरमधील पापनाश याठिकाणी शिवलिंग स्थापन केले होते. रावण हा महादेवाचा खूप मोठा भक्त होता आणि तो एक ब्राह्मण होता. ब्राह्मणाला मारणे हे महापाप आहे. आपण एक शिवभक्त असलेल्या ब्राह्मणाचा वध केला. याचा प्रभू रामाला पश्चाताप होत होता. मी माझ्या पापाचा नाश कसे करू म्हणून श्रीराम महादेवाचे नामस्मरण करत शिवनाम जपत होते. शिवाचे ध्यान करत असताना तेथे एक शिवलिंग उद्भवले. त्यांच्या डोळ्यासमोर याठिकाणी शिवलिंग प्रकट



झाल्यावर त्याची पूजा करण्यासाठी श्रीरामाने पाणी शोधले तेव्हा तेथे पाणी नव्हते. श्रीरामाने एका ठिकाणी बाण मारला तेव्हा तेथे पाणी लागले. त्या पाण्याने श्रीरामांनी शिवलिंगाची पूजा केली. पाप परिहार करण्यासाठी श्रीराम याठिकाणी आले होते. साक्षात ब्रह्मा, विष्णू, महेश हे तीन देव येथे प्रकट झाले. त्या तिघांनी श्रीरामाला सांगितले, तू कोणताही पाप केला नाहीस. तू सर्व पापांपासून मुक्त आहेस. तुझ्या पापाचा नाश झाला आहे असे सांगितले तेव्हापासून या ठिकाणाला पापनाश हे नाव देण्यात आले.

भगवान श्रीरामाने या मंदिरात शिवलिंग स्थापन केले होते. मंदिर संकुलात एक मोठे शिवलिंग असून तेथे तीन अन्य शिवलिंग आहेत. हे तीन शिवलिंग म्हणजेच ब्रम्हा, विष्णू, महेश या ठिकाणी प्रकट झाले होते. मूळ मंदिराच्या अवशेषांवर नवीन मंदिर बांधले आहे. मंदिराच्या पायथ्याशी एक मोठा (कुंड) तलाव आहे. जो पापनाश या नावाने ओळखला जातो. श्रावण महिन्यामध्ये याठिकाणी भाविकांची खूप गर्दी असते. मोठी शिवरात्री या मंदिरात साजरा केला जाणारा मुख्य उत्सव आहे. शिवरात्रीला एक साप या मंदिरातील मोठ्या शिवलिंगाची देखरेख करायला येतो ते पहायला याठिकाणी पर्यटक येतात. याठिकाणी येणाऱ्या सर्व भक्तांचे पाप नष्ट होतात अशी मान्यता आहे. त्यामुळे पापनाश शिव मंदिर या ठिकाणी मोठ्या संख्येने लोक येतात.



ब्रिदीकला:

बिदर येथील ब्रिदीकला (ब्रिदीवेअर) प्रसिद्ध आहे. प्रामुख्याने स्थानिक मातीपासून केलेली भाडी (पॉटरी) त्यावर पेटिंग आणि चांदीच्या तंतूपासून केलेले नक्षीकाम या कलेचे वैशिष्ट्य आहे. बिदर येथे शोभेच्या उत्कृष्ट धातूच्या वस्तू बनविल्या जातात. कोरीव कामाची ही कला पिढ्यानपिढ्या हाती दिली गेली आहे. पर्शियन, तुर्की आणि इस्लामिक संस्कृती या कलेत दिसते.

ब्रिदी वस्तू बनवण्यासाठी बिदर किल्ल्यातील एका विशिष्ट ठिकाणाहून माती घेतली जाते. ही माती अशा जागेतून घेतली जाते. जिथे वर्षानुवर्षे सूर्याची किरणे त्या मातीवर पडलेली नसतात. पावसाचे पाणीही पडलेले नसते. त्यामुळे या मातीचे ऑक्सीकरण होते. बिदरच्या किल्ल्यातील मातीची कारागिरांनी चाचणी केली आहे. ही माती अमोनियम क्लोराईडमध्ये मिसळली जाते. नवसाराम नावाच्या पेस्टमध्ये बनवले जाते. ज्यामुळे पात्राचा पाया रंग चमकदार काळा होतो. त्यातील चांदीचे काम पूर्णपणे चमकदार राहते. बिदर किल्ल्यातील माती बिद्री वस्तू बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.



भांडे-जसे प्लेट, वाडगा, चमचा इ. स्टेशनरी जसे पेन, कंटेनर, कागदाचे कटिंग, लहान दागिने ठेवण्यासाठी चांगली वस्तू लेटरिंग दागिने, ब्रेसलेट, बांगड्या, हार, पेंडल, कानातले इ. शोभेच्या वस्तू मूर्त्या, हत्ती, फुलदाण्या इत्यादी.



प्राचीन काळी कारागीर तलवारीची गोल, ढाल, पांडण अशा अनेक वस्तू या कलेचा वापर करून बनवत असत. पण आता या सर्व गोष्टी केवळ संग्रहालयातच दिसू लागल्या आहेत. बिद्री वस्तू बनविण्याची सर्व प्रक्रिया ही हाताने केली जाते. त्यामुळे बिद्री वस्तू बनवण्यासाठी वेळ लागतो. या वस्तूवरती अशरफी औषधी वनस्पती (द्राक्षाचे वेल), पाने पट्टया, भूमितीय रचना, फुले इत्यादी लोकप्रिय डिझाइन आहेत. कुराणमध्ये इराणी गुलाब आणि अरबी हाताने लिहिलेल्या श्लोकांच्या रचनांना जगभरात मोठी मागणी आहे. पारंपरिक उत्पादने हुक्का, आफताब, वाटी, जग, शोपिस वस्तू, मुकाब आणि मिर-ए-फरसबंदी तर आधुनिक उत्पादनामध्ये किचेन, ऑफिस स्टेशनरी, राख ट्रे, पुतळे इ.

चिंतलगेरे:

चिंतलगेरे हे बिदर शहरापासून दक्षिणेस २२ कि.मी. अंतरावर असून या ठिकाणी असलेल्या वीरभद्रेश्वर मंदिर व मंदिरातील वार्षिक जत्रेसाठी लोकप्रिय आहे.

ISBN: 978-93-5810-881-1

४. बसवकल्याण तालुक्यातील पर्यटनस्थळे:

कर्नाटक राज्यातबिदर जिल्ह्यातील हा एक महत्वाचा तालुका असून प्राचीन व पुरातन वारसा लाभलेला हा तालुका बिदर शहराच्या पश्चिमेस ८५ कि.मी. अंतरावर पुणे-सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ च्या उत्तरेस ६ कि.मी अंतरावर वसले शहर असून ते कर्नाटकातील बिदर जिल्हाच्या हुलसूर, भाल्की व हुमनाबाद, गुलबर्गा जिल्हाच्या आळंद, गुलबर्गा व चिंचोळी महाराष्ट्रातील लातूर जिल्हाच्या निलंगा, उस्मानाबाद जिल्हाच्या उमरगा या तालुका व मुख्यालयाशी प्रत्यक्ष रस्ते मार्गांनी मार्गांने जोडलेले आहे. या व्यतिरिक्त भाल्की रेल्वे स्थानकापासून रेल्वे स्थानकापासून ४३ कि.मी. तर बिदर व गुलबर्गा रेल्वे स्थानका पासून ७५ कि.मी. अंतरावर आहे. हवाईमार्गाने येण्यासाठी जवळचे हवाई स्थानक हैद्राबाद आहे.

या शहरात चालुक्य कालीन किल्ला, अनेक हिंदू मंदिरे, दर्गा, गुहा, धार्मिक ठिकाणे, ऐतिहासिक स्थळे व मनोरंजनाची ठिकाणे असल्याने आधुनिक काळात पर्यटनात जिल्हातील प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून ओळख निर्माण करत आहे. त्यातील कांही प्रमुख स्थळांची माहिती प्रस्तुत प्रकरणात देण्यात आलेली आहे.



गुरुचरित्र ग्रंथातील उल्लेखानुसार या शहराचा इतिहास ३००० पूर्वीपासून असून हे शहर साक्षात दत्त प्रभूचे क्षेत्र व देवी सरस्वतीचे पीठ आहे. या शहराचा विकास अकराव्या शतकात बादामीच्या चालुक्यांचा वंशज पहिल्या सोमेश्र्वराने आपली राजधानी मान्यखेट (मालखेड) सोडून कल्याणपूर किंवा कल्याण ला स्थापन केल्याने सुरु झाला. त्यामुळे हा भाग पूर्वी 'कल्याण' या नावाने ओळखला जात असे. प्राचीन काळात ‘कल्याण’ नंतर ‘कल्याणी’ या नावाने हे शहर ओळखले जाऊ लागले त्यानंतर १० व्या शतकात बहमनी राज्याच्या काळात या शहराला कसबा कल्याण म्हणूनही ओळखले जात असे. चालुक्यांची राजधानी कल्याणी हे सामाजिक व धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या प्रसिद्ध असल्याने संतानी याला आपले घर बनविले. उदा बसवेश्वर, अल्लमप्रभू, अक्का महादेवी, चनाबसवन्ना आणि सिद्धारम. येथील चालुक्यकालीन किल्ला प्रसिद्ध आहे. महात्मा बसवेश्वरांच्या शरणनीतीचा, समाजक्रातीच्या समता चळवळीचा उदय याच कल्याण मध्ये झाला. १२ व्या शतकाच्या उत्तरार्धात चालुक्याचा नंतर आलेल्या बिज्जळ कलचुरी राजसत्तेत त्यांच्या दरबारी जगज्योती महात्मा बसवेश्वरांनी जगाला शांती व समतेचा संदेश देऊन अंधश्रध्देला कडाडून विरोध करत या भागात स्वतंत्र वीरशैव (लिंगायत) पंथाची स्थापना केली. महात्मा बसवेश्वरांनी 'अनुभव मंटपम' याच पवित्र भूमीत निर्माण केले. आजही या शहरात बसवकालीन शरणांच्या गुहा, ऐक्यस्थळ, स्मृतीस्थळे, मठ, कायकस्थळे आपल्याला पहायला मिळतात. बसवेश्वरांची कर्मभूमी म्हणून हा भूभाग ओळखला जातो. या काळात अध्यात्मिक वृद्धीचा विकास होऊन

ISBN: 978-93-5810-881-1

ही शैक्षणिक भूमी बरोबरच सामाजिक परिवर्तनाची भूमी बनली.त्यामुळे आधुनिक काळात त्यांच्या नावावरून या शहराला बसवकल्याण या नावाने ओळखले जाते.

बिज्जळ कलचुरी नंतर देवगिरीचे यादव, चौदाव्या शतकात बहमनी राज्य, आदिलशाही राज्य अशी अनेक सत्तांतरे येथे झाली. १६५३ मध्ये हे शहर मोगलांनी लुटले आणि १६५६ मध्ये औरंगजेबाने येथील किल्ला जिंकला. त्यानंतर निजामशाहीकडून मोगलांकडे गेलेल्या एका सरदाराला हे शहर जहागिरी म्हणून मिळाले. पुढे हैद्राबादच्या निजामाने या भूभागावर आपले अधिराज्य गाजवले. त्यामुळे हैदराबाद संस्थानात याचा समावेश होता १७ सप्टेंबर १९४८ ला संस्थानाच्या विलिनीकरणानंतर कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यात याचा समावेश होऊन हा भूभाग भारताच्या संघ राज्यात सामील झाला. जगज्योती महात्मा बसवेश्वरांनी कार्यकर्तुत्वामुळे हा भागातील सामाजिक चळवळ जनमानसात रुजल्याने इ.स. १९६५ मध्ये कल्याण या शहराचे 'बसवकल्याण' असे नामांतर करण्यात आले.

बसवकल्याणचा किल्ला:

बसस्थानकापासून १.५ कि.मी. अंतरावर, बसवकल्याण शहराच्या उत्तरेस दक्षिण भारतातील सर्वात प्राचीन आणि सर्वात प्रभावी किल्ल्यांपैकी एक असा चिरेबंदी दगडी पायावर उभारलेला चालुक्यकालीन भव्य भुईकोट किल्ला पुरातन वैभवाची साक्ष देणारा असल्याने आकर्षक आहे. कल्याणीच्या चालुक्य घराण्याची राजधानी म्हणून येथून राज्यकारभार चालत असे . १२ व्या शतकात याच किल्ल्यात राजा बिज्जळाच्या दरबारी महान संत व आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर होते.



पुढे इ.स. १६५३ मध्ये हे शहर मोगलांनी लुटले आणि १६५६ मध्ये औरंगजेबाने येथील किल्ला जिंकला. त्यानंतर निजामशाहीकडून मोगलाकडे गेलेल्या एका सरदाराला हे शहर जहागिरी म्हणून मिळाले.

किल्ल्यात प्रवेश करत असताना सुरुवातीला एक भव्य दगडी दरवाजा लागतो. ज्याच्यावर सुंदर दगडी झरोके आणि चारी बाजूला लाल दगडांनी घुमटाकार मिनार बांधलेले आहेत. ज्याचे बांधकाम पूर्णतः मुस्लिम पद्धतीचे आहे. दरवाज्यातून आपण जेव्हा आत प्रवेश करतो तेव्हा आपल्याला समोर मोकळे पटांगण दिसते. मोकळया आवारात एक सुंदर दगडी कारंजा आहे. ज्याच्या मध्यभागी नक्षीकाम केलेला एक दगड ठेवलेला आहे. या किल्ल्यात एक मशीद आहे. काही ओवऱ्या बांधलेल्या दिसतात. छोटी इमारतही आहे. हे सर्व बांधकाम हैदराबादच्या निजामाने केलेले आहे.

ISBN: 978-93-5810-881-1



हा किल्ला तटबंदीच्या संरक्षक संरचनेच्या रणनीतीसाठी बनविण्यात आला होता. किल्ल्याला एकूण सात दरवाजे आहेत. त्यातील पाच अजूनही जशाच्या तसे मजबूत अवस्थेत आहेत. प्रवेशद्वाराजवळ बाल्कनीसह एक भव्य कमान आहे. ज्यामध्ये दोन्ही बाजूच्या पायऱ्यांद्वारे प्रवेश केला जाऊ शकतो. किल्ल्याचा मुख्य दरवाजा अखंड दरवाजा म्हणून ओळखला जातो. या प्रवेशद्वाराच्या आतल्या दोन्ही बाजूने पहारेकऱ्यांसाठी देवड्या आहेत. दुसऱ्या दरवाज्यात प्रवेश करण्यासाठी प्रथम प्रवेशद्वारावर असणारा खंदक ओलांडावा लागतो. किल्ल्याच्या प्रथम दरवाजापासून दुसऱ्या प्रवेशद्वारामध्ये खंदक असून पूर्वीच्या काळी यावर काढता घालता येणारा लोखंडी पूल होता. पण सध्या येथे कायमस्वरूपी दगडी पूल बांधलेला आहे.

किल्ल्याचे दुसरे प्रवेशद्वार भारदस्त वाटते. कारण दरवाज्याच्या दोन्ही बाजूला भक्कम बुरूज आहेत. आत प्रवेश केल्यास दोन्ही बाजूने उंच तटबंदीने वेढलेली नागमोडी वाट आहे. किल्ल्यामध्ये सापडलेले तोफगोळे या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला ठेवण्यात आलेले आहेत. या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला पाच खोल्या आहेत. त्याला जेलसारख्या काळया सळया लावलेल्या आहेत. त्यातच प्रत्येक खोलीला एक छोटा दरवाजा आहे. या खोल्यांना पाहून असे वाटते की, पूर्वीच्या काळी ह्या पहारेकऱ्यांच्या देवाड्या असतील नंतर हे हैद्राबादच्या निजामाने या खोल्यांचा उपयोग कैद्यांना ठेवण्यासाठी केला असेल. या खोल्यांना लागूनच काही पायऱ्या आहेत. त्या चढून गेल्यावर आपण दुसऱ्या प्रवेशद्वारावर असणाऱ्या बुरुजावर जाऊन पोहचतो. थोडे पुढे चालत गेलो की किल्ल्याचा तिसरा दरवाजा येतो. थोडेसे वळण देऊन दोन बुरुजांच्यामध्ये किल्ल्याचा तिसरा दरवाजा बनवलेला आहे. दोन्ही दरवाज्यामध्ये असणाऱ्या मोकळ्या जागेत एक सुंदर कोरीव काम केलेल्या अखंड पाषाणात कोरलेली हत्ती, घोडा व काही भग्न मूर्त्या आजूबाजूला पडलेल्या दिसतात. किल्ल्याला लष्करीदृष्ट्या मजबूत बनविण्यासाठी किल्ल्याच्या बाहेरील तटबंदीमध्ये एकूण १६ देखणे बुरुज बांधलेले आहेत. किल्ल्याचा तिसरा दरवाजा ओलांडल्यावर आणखीन दोन-तीन दवाजे लागतात. चौथ्या दरवाज्यावर एक भव्य गोलाकार बुरूज आहे. त्याला एक गुप्त सज्जा देखील आहे. या सज्ज्यामधून किल्ल्यात चालणाऱ्या सर्व हालचालींवर लक्ष ठेवता येत असे. किल्ल्याचा सातवा आणि शेवटचा दरवाजा असून किल्ल्यात प्रवेश केल्यावर डाव्या बाजूला दगडी पायऱ्यांचा जिना आहे जो किल्ल्यातील सर्वात उंच बुरुजाकडे जातो. या सर्वोच्च बुरुजावर या किल्ल्याची खासियत असणारी कडकबिजली तोफ एका आसावर बसविण्यात आली आहे. ही तोफ पंचधातूपासून बनवण्यात आली आहे. या तोफेवर कोरीवकाम आहे. कोरीव कामात मीनावर्क केलेले असून सोने नक्षीकामही आहे. ती ३६० अंशात आजही फिरवता येते. ही तोफ मगरीच्या तोंडासारखी दिसते.

ISBN: 978-93-5810-881-1



मुख्य किल्ल्यात दरबारमहल नावाची एक सुंदर वास्तू आहे. दरबार महालाच्या समोर एक मंदिराचा गाभारा आहे. सध्या या मंदिरात कोणतीही मूर्ती नाही पण एकेकाळी या मंदिरात देवीची मूर्ती होती असे सांगितले जाते. या मंदिराच्या जवळील छोट्या दरवाज्यातून छोट्या प्रांगणात एक दर्गा आहे. पण त्याच्या बांधकामावरून हे पूर्वी देऊळच असेल असे वाटते. या किल्ल्यातील सर्व स्थापत्यकला मुस्लिम शैलीत आहेत. या महालाच्या अंगणात मधोमध आयताकृती एक संपूर्ण लांबीचा पाण्याचा पाट आहे. त्याच्या समोर तालीमखाना आहे. हैदरमहल या वास्तूच्या जवळील बुरुजावर 'नऊगज' नावाची तोफ ठेवलेली आहे. या किल्ल्यात एक राजमहल देखील आहे आणि एक मस्जिद देखील आहे. हा किल्ला कर्नाटक तसेच केंद्र सरकारच्या पुरातत्त्व वास्तू विभागाकडे आहे.

किल्ला सोमवार व्यतिरिक्त सकाळी ९:३० मी पासून सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत उघडा असतो. किल्ल्याच्या शेजारी एक स्वतंत्र इमारतीत पुरातन वास्तूसंग्रहालय आहे. ज्यामध्ये पुरातन वस्तू पाहावयास मिळतात.

अनुभव मंटप:

मानवाच्या इतिहासातील अनुभव मंतप्पा ही पहिलीच संसद होती. बसवेश्वर महाराज पंतप्रधान होते. ते एकाच वेळी संपादक आणि कपायलर म्हणून काम करत होते. अनुभव मंतपा यातील सदस्यांची निवड अनुभव मंटपाच्या उच्च अधिकाऱ्यांकडून केली जात असे. लोकाद्वारे केली जात नसे. सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, योगशास्त्रीय आर्थिक आणि साहित्यिक क्षेत्राच्या विविध प्रकारच्या अपेक्षित आवश्यक पात्रता यानुसार नेमणूक केली जायची. लोकशाही आधारावर धर्म बसविण्याचा बसवेश्वरांचा उत्कट आदेश, मानवतेची सेवा करण्याची त्याची अथक शक्ती अनुभव मंटपाच्या वैभवात भर घातली. विविध



व्यवसाय व व्यवसायातील हे सर्व लोक अनुभव मंटपाचे सदस्य होते. अनुभव मंटप बाराव्या शतकातील अध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानविषयक परिषद होती. जगातील पहिली लोकसंसद २७ वर्षे अविरत चालली. लोकसंसदेत बसून

शरणांनी ताम्रपटावर एक कोटी वचने लिहिली. वचन लिहिण्याआधी शरण मंडळी गुहेत बसून चितन करायचे. शरणांची वचने हीच आज लिंगायत धर्माचा प्रमाण ग्रंथ आहे.

कर्म, दान-धर्म आणि दासोह ही बसवेश्वराची चतुःसूत्री आहे. 'कायकवे कैलास' श्रम हेच ईश्वर हा मूलमंत्र बसवेश्वरांनी स्वानुभवातून अर्थव्यवस्थेला दिली. शरणाच्या स्वानुभवातून वचने जन्माला आली तीच वचने म्हणजे भारतीय संविधानाचा गाभा आहे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता ही मूल्ये शरणांच्या समताधिष्ठित वचनात दडली आहेत. अशा प्रकारची १२ व्या शतकात 'अनुभव मतप्पा' नावाची अध्यात्मिक लोकशाही स्थापन केली. ही लोकससंद 770 स्त्री पुरुषांची महासभा होती.

भाल्कीचे मठाधीश परमपूज्य बसवलिंग पट्टदेवरु यांनी बसवकल्याणमध्ये अनुभव मंटप ही इमारत बांधली. या छतावरील शिवलिगाची प्रतिकृती असलेली ही एक छोटी इमारत आहे. हॉलच्या शेवटी एक परिपत्रक व्यासपीठ आहे. ज्याच्या पायथ्यावरील पायऱ्यांवर पायऱ्या आहेत. मुळात ते एक उंच व्यासपीठ होते. त्याच्या शिखरावर अल्लमप्रभू शरणांच्या परिषदेचे अध्यक्ष होते. सर्वोच्च आसनावर बसवेश्वरांची सुंदर प्रतिमा आहे. या अनुभव मंटपामध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात वचनसाहित्य विजयोत्सव साजरा केला जातो.

नवीन आधुनिक 'अनुभव मंडपम'

१२ व्या शतकात बसवकल्याण येथे बसवेश्वरांनी स्थापन केलेले 'अनुभव मंडपम' हि जगातील पहिली संसद असावी. येथे विविध ज्ञानी, पंडित, तत्त्ववेत्ते आणि समाजसुधारकांनी अनेक विषयावर साधक बाधक चर्चा व वादविवाद केले जात असे. त्यामुळे 'अनुभव मंडपम' द्वारे लोकशाहीचे बीजारोपण या पावन भूमीत झाल्यामुळे बसवकल्याण येथे शासनाच्या वतीने आधुनिक पद्धतीने तिपरांत तलावाच्या



ISBN: 978-93-5810-881-1



काठावर २५ ते ३० एक्करांमध्ये ६१२ कोटी रुपये खर्च करून कल्याणीच्या चालुक्य वास्तूकलेवर आधारित नवीन 'अनुभव मंडपम' उभारले जात आहे. नवीन आधुनिक 'अनुभव मंडपम' जगज्योती महात्मा बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानाच्या विविध तत्त्वांचे प्रतिनिधित्व करणारी असेल. साडेसात एक्कर जागेवर ७७० खांबांवर आधारलेल्या वास्तूच्या शिखरावर भव्य शिवलिंग असेल. या वास्तूत ७७० लोकांची आसनक्षमता असलेले भव्य सभागृह असणार आह जे १२ व्या शतकात वचन सुधारणावादी चळवळीत सहभागी असणाऱ्या महात्मा बसवेश्वरांच्या ७७० शरणांचे (अनुयायी) चे प्रतिक असेल. या चार मजली ५१ मीटर उंच इमारतीत अत्याधुनिक रोबोटिक सिस्टीम, ओपन एअर थिएटर, आधुनिक जलसंधारण प्रणाली, ग्रंथालय, इतिहास, विज्ञान संग्रहालय, सदाचारा, शिवाचारा, लिंगाचारा व भरतीचारा थीम क्षेत्र, संशोधन केंद्र, प्रार्थना सभागृह आणि योग केंद्र इत्यादींचा बाबीही असणार आहेत.





महात्मा बसवेश्वरांचा १०८ फुटी पुतळा:



महात्मा बसवेश्वरांचा महाकाय पुतळा शिल्पकार कै. श्रीधर मूर्ती या शिल्पकाराने बनविला आहे. हा पुतळा ६०x ६० फूट आहे. हा जमिनीत २४ फूट खोल व वर १०८ फूट आहे. या मूर्तीचे अनावर २८ ऑक्टोबर २०१२ मध्ये झाले. हे निर्माण करण्यासाठी जगद्गुरु पुज्य माते महादेवी यांनी पुढाकार घेतला होता.

लिगायत धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी पूज्य माते महादेवी यांनी इ.स.२००१ मध्ये लिंगायत धर्मपीठाची स्थापना केली. हे धर्मपीठ चार

ISBN: 978-93-5810-881-1



मजली असून यात प्रार्थना मंदिर, ध्यानग्रह आणि शरण धाम आहे. वृद्धाश्रम, निलांबिका अनाथालय, सभामैदान इ. सोयीसुविधा या धर्मपीठात आहेत.

या ठिकाणी महिन्याच्या प्रत्येक पोर्णिमेला शरणसंगम कार्यक्रम घेतला जातो आणि आठवड्याच्या प्रत्येक रविवारी सामुदायिक प्रार्थना घेतली जाते. व्याख्यान, प्रवचन या धर्मपीठात होतात.

महात्मा बसवेश्वरांच्या १०८ फूट मूर्तीच्या खाली ध्यानमंटप आहे. तेथे महात्मा बसवेश्वरांची सुंदर मूर्ती स्थापन केली आहे. मूर्तीच्या खुल्या जागेमध्ये सुंदर उद्यान आहे. बाजूला ३६ मूर्तीच्या शिल्पातून महात्मा बसवेश्वरांचे जीवनचरित्र शिल्पसंग्रहालय आवर्जून पाहण्यासारखे आहे.

महात्मा बसवण्णा गुहा: याच महामनेमध्ये महात्मा बसवण्णा नावाची ३६५ मीटर लांब गुहा बनवण्यात आली आहे. या गुहेमध्ये महात्मा बसवण्णा, माता निलांबिका, अक्कामहादेवी चन्नबसवा, शिवयोगी सिद्धरामेश्वर, माडीवाळ माचय्या या पटगणाधिशांच्या हुबेहूब मूर्त्या आहेत.

अक्कामहादेवी गुहा: महात्मा बसवेश्वरांच्या महाकाय पुतळयाच्या उत्तर बाजूला अक्कामहादेवी यांची गुहा आहे. ही गुहा ६०० फूट लांब असून याच्या प्रवेशद्वाराजवळ जंगल बनविले आहे. या गुहेत देखील अनेक शरणाच्या मूर्त्या स्थापन केल्या आहेत. बसवेश्वरांच्या महाकाय मूर्तीच्या पाठीमागे आकाराने गोल साठवण तलाव करून मध्यवर्ती हरळय्या आणि कल्याणम्मा व लावण्यवती यांचे शिल्प तयार केले आहे.

शरणग्राम: शरण भिमय्या, अक्कम्मा, बहुरूपी चौडय्या, बाचीकायक बसवय्या, शरणी गौरम्मा, पुण्यश्री दुग्वळे, शरण हविनाळ कलय्या, शरण जेडरा दोसिमय्या, शरण हुगार मादय्या, शरण सोमव्वे, संकव्वे, भिमव्वे, काळव्वे, वैद्य संगण्णा या सर्व कायकधारी शरणांचा गावगाडा शरणग्रामामध्ये यांचे शिल्प सुंदर बोलक्या व हुबेहूब मूर्त्या शरणग्रामामध्ये आहेत. बसवेश्वरांच्या महाकाय मूर्तीकडे खालून जात असताना १०८ पायऱ्यांचे दोन पथमार्ग आहेत. त्याच्या मध्यभागी उतरत्या क्रमाने अल्लमप्रभू, मलेय महादेश्वर, संतशिरोमणी मन्मथ माऊली, तोटदसिद्ध लिंगेश्वर, धनलिंगदेवरक, षण्मुखशिवयोगी, गुरुमल्लेश, पुज्य लिंगानद स्वामीजी या आठ शरणांच्या रथारूढ मूर्त्या स्थापित केल्या आहेत.

उमा महेश्वरा मंदिर, उमापूर:



बसवकल्याणपासून १८ कि.मी. अंतरावर हैद्राबाद-पुणे महामार्गालगत महाराष्ट्र- कर्नाटक सीमावर्ती उमापूर गावात उमा महेश्वर मंदिर आहे. हे मंदिर १२ व्या शतकात चालुक्य कारकिर्दीत बांधले होते. हे मंदिर भगवान शिव यांना समर्पित आहे. या मंदिराच्या आवारात दोन मंदिरे

ISBN: 978-93-5810-881-1

आहेत. ही मंदिरे राजा सोमेश्वरा प्रथमचा दुसरा मुलगा विक्रमादित्य यांच्या कारकिर्दीत बांधली गेली. दोन्ही मंदिरावरती शिखर आहेत. खुल्या आवारात गणपतीची मूर्ती आहे. गर्भगृहात एक शिवलिंग आहे. त्याच्या समोर नंदी आहे. एका मंदिराच्या प्रवेशद्वारात एक मासा आणि कासव आहे. एका मंदिराच्या बाहेरील भिंतीवर महेश्वरीची नंदी बसलेले एक शिल्प आहे. या मंदिरात चार सशस्त्र नृत्य करणारे शिव आणि नायक कोरलेले दगड आहेत. याठिकाणी पर्यटक भेटी देतात.

शिव मंदिर, नारायणपूर:

बसवकल्याणपासून ६ कि.मी. अंतरावर नारायणपूर या गावी १२ व्या शतकातील चालुक्यांनी बांधलेले शिवमंदिर आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारावर एक नायक दगड आणि शिलालेखांसह विविध शिल्पे आहेत. या मंदिराची रचना जलसांगवीच्या कमलेश्वरा मंदिरासारखी आहे. मंदिरात चिल्ला खाब आहेत. भव्य दगडी बांधकाम असलेला दगडांचा विशाल शिलालेख आजही उभा आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ अत्यंत जटील शिल्पांची एक जोडी पौराणिक निर्मात्याच्या मुखातून आलेला आकार शंखच आहे. त्यातच एक चक्र देखील आहे. डावीकडे विष्णू आणि गरुड आहेत. उजवीकडे



नृसिंह आहे. कन्नड शिलालेख आणि एक नायक दगड असलेल्या स्लॅबसह ९ स्लॅब आहेत. मंदिराच्या आतील भागात ८ स्तंभ आहेत. गर्भागुडी दरवाज्याच्या चौकटीत ९ पायऱ्या आहेत. श्री गणेशाच्या मूर्तीने त्याचे वाहन मुशक, मादक तरुणीला धरून तिच्या पंखामध्ये तिचा हात उंचावला. अशी मंदिराची सुंदर शिल्पकला पाहण्यासाठी पर्यटक जातात.

श्री कमलेश्वरा मदिर जलसांगवी



बसवकल्याण पासून ३८ कि.मी. अंतरावर कमलेश्वरा मंदिर आहे तर बिदरपासून ४५ कि.मी. अंतरावर कमलेश्वरा मंदिर जलसांगवी या गावामध्ये आहे. कमलेश्वरा मंदिर चालुक्य कारकिर्दीतील चौथा राजा विक्रमादित्य यानी बांधले. जलसांगवी हे गाव चालुक्याच्या कारकिर्दीमध्ये प्रमुख केंद्र होते. हे मंदिर एक छोटी आयताकृती रचना आहे. मंदिराच्या आत एक

शिवलिंग आहे. हे मंदिर उत्कृष्ट मदनिका शिल्पासाठी प्रसिद्ध आहे. ते दागदागिने आणि अटेरिसने जोरदार सजावट केलेले आहे. या मंदिरातील सर्वात प्रसिद्ध शिल्पकला म्हणजे कन्नडमध्ये एपिग्राफ लिहिणारी एक महिला एक सुंदरी (शिलाबिका) या पौराणिक स्त्रीचे शिल्प रेखाटलेले आहे. हे नाचलेल्या स्थितीत सुदर स्त्रीचे शिल्प आहे. हे मंदिर आता राज्य पुरातत्त्व विभागाच्या स्वाधीन आहे. त्या काळात बांधलेल्या या मंदिरावरील शिल्पकला पाहण्यासाठी आजही पर्यटक येथे मोठ्या संख्येने येतात.

दर्गाह हजरत ताजुद्दीन बाबा शेर-ए-सावर व हजरत खाजा बंदे नवाज गेसू

हजरत ताजुद्दीन बाबा शेर-ए-सावर हे बसवकल्याण शहरातील अत्यंत पुरातन मुस्लीम धर्मियांचे धार्मिक क्षेत्र असून या ठीकांनी देशाच्या अनेक भागातून लोक भेटी देण्यासाठी येतात.

हजरत सय्यद ताजुद्दीन हे पैगंबराचे वंशज असून ताज औलिया आणि शेर सावर अशा त्यांना उपाधी ने ओळखले जात असे. ते नेहमी वाघावर (हिंदीत शेर) बसून स्वार करायचे त्यावेळी त्याच्या हातात साप असायचा. सापाचा वापर ते चाबूक म्हणून करत असल्यामुळे हजरत सय्यद ताजुद्दीन यांना दख्खनमध्ये “राजा शेर सावर” म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी गुरु खाजा कुतुबुद्दीन यांच्या कडून



धार्मिक प्रतीज्ञा घेतली व पुष्कळ वर्षे प्रार्थना व उपासना करून मानवरच नाही तर प्राणी व पक्षी यांच्यावरही नियंत्रण मिळवण्याची शक्ती प्राप्त केली. त्यांनी केलेल्या अध्यात्मिक ज्ञान प्राप्तीने त्यांची सुफी संत म्हणुन ओळख निर्माण झाली. ज्ञानप्राप्ती नंतर गुरूने दिलेल्या प्रतिज्ञा नुसार त्यांनी धर्म प्रचार व प्रसार, धर्म उपदेश करण्यासाठी अनेक भागात भ्रमंती केली. मानवाला ईश्वर आणि सत्य याविषयी ज्ञान देऊन त्यांना प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला. बहामणी राजवटीच्या काळात त्यांनी दख्खनच्या भूभागातील लोकांमध्ये इस्लाम धर्म प्रचारा व प्रसार करत अल्लाच्या अध्यात्मवादाचा प्रचार करून त्यांच्यात प्रेम आणि सहिष्णुता निर्माण केली ते वयाच्या 90 व्या वर्षी म्हणजेते इस्लामिक कालगणनेप्रमाणे 789 हेगिराला बसवकल्याण ला आले. तेव्हा त्यांची भेट येथील हजरत खाजा बंदे नवाज गेसू यांच्यासोबत झाली. हे दोघेही अल्लाचे परम भक्त व संत होते. या थोर व्यक्तिमत्वाने या भूमीत शेवटचा श्वास घेतला व जगाचा निरोप घेतला. त्यांची येथे कबर आहेत. हजरत ताजुद्दीन बाबा शेर-ए-सावर यांच्या पुण्यस्थिती निमित्त आजही बसवकल्याण येथे 20 शव्वाल ते 23 शव्वाल या दिवशी मोठ्या प्रमाणात



ISBN: 978-93-5810-881-1

ऊरूस साजरा केला जातो. या वेळी निरनिराळ्या भागातील वेगवेगळ्या समाजातील, विविध क्षेत्रातील लोक, जाती-धर्माचा विचार न करता, हजरत ताजुद्दीन शेर सावर यांच्या प्रसिद्ध समाधीवर नतमस्तक होण्यासाठी दरवर्षी जमतात. या व्यतिरिक्त एका आख्यायिका नुसार हजरत शेर सावर यांच्या दर्गामध्ये रोगग्रस्त व्यक्तीने चांदीची चैन / कडे एक रात्र पवित्र कबरीच्या कपड्यात ठेऊन ती चैन/ कडे जर दुसऱ्या दिवशी आपल्या उजव्या हातात घातल्यास हजरत ताजुद्दीन शेर सावर यांच्या आशीर्वादाने त्यांचे रोग बरा होतो म्हणून मागील ६०० वर्षापासून अनेक रोगग्रस्त व्यक्तीं हि या दर्गाला आवर्जून भेटी देत असतात.

हुतात्मा स्मारक: गोर्टा

गोर्टा हे बसवकल्याण तालुक्यातील एक गाव असून या गावाची ओळख निजाम कालीन क्रांतीकारक गाव म्हणून आहे. हे गाव बसवकल्याण मुचळंब मार्गे भाल्की या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या रस्त्यालगत असून बसवकल्याण शहरापासून १९ कि.मी. भाल्की पासून २५ कि.मी. तर हुमनाबाद पासून २८ कि. मी. अंतरावर आहे. या तीनही शहरांना रस्ते मार्गांनी हे गाव जोडले गेलेले असून या गावात निजामकाळात (भारतीय स्वातंत्र्यत्तोर काळात) १० मे १९४८ रोजी झालेल्या हत्याकांडात शहीद झालेल्या २०० स्वातंत्र सैनिकांच्या स्मरणार्थ मार्च २०२३ मध्ये भव्य हुतात्मा स्मारक उभारण्यात आलेले आहे.



गोर्टा गावाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या या भव्य हुतात्मा स्मारकात एक सुरेख व भव्य हुतात्मा स्मारक, १०३ फुटी भव्य तिरंगा ध्वज, व देशाचे पहिले गृहमंत्री तथा हैदराबाद-कर्नाटक-मराठवाड्यातील जनतेला निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्तीचे प्रणेते सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. लाल दगडी बांधकामात असलेली संरक्षक भिंत, विकसित होत असलेली हिरवळ या ठिकाणी पर्यटकाच्या मनाला भुरळ घालत असते.



गोर्टा येथील हुतात्म्यांना, संपूर्ण देशाला शेकडो वर्ष आदरांजली वाहता यावी, यासाठी भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाच्या माध्यमातून हे स्मारक उभारण्यात येत असून याचे भूमिपूजन हैद्राबाद मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने १७ सप्टेंबर २०१४ रोजी झाले होते तर त्याचा लोकार्पण सोहळा २६ मार्च २०२३ रोजी संपन्न झाला. महान

ISBN: 978-93-5810-881-1

हुतात्म्यांची गाथा सांगता यावी यासाठी येणाऱ्या काळात लाइट अँड साऊंड शो प्रकाश आणि ध्वनी कार्यक्रम आयोजित करण्याचीही योजना आहे.

श्री सदानंद स्वामी मठ :

बसवकल्याण हे प्राचीन व पौराणिक परंपरा लाभलेले क्षेत्र आहे. या ठिकाणी असलेले श्री सदानंद स्वामी मठ हे आनंद संप्रदायाचे एक मुख्य पिठ आहे. तसेच श्री दत्ताचे हे पवित्र क्षेत्र असून येथे श्रीदत्त पीठ आणि श्री सरस्वती पीठ एकाच ठिकाणी आहे. या बरोबरच या ठिकाणी श्री गणपतीची एक शिरच्छेदापूर्वीची सुमुख श्री गणेशाची विलक्षण व सुंदर मूर्ती असल्याने हे अतिशय जागृत ठिकाण समजले जाते. मुख्य मंदिरामागे औदुंबराचा वृक्ष असून भुयारामध्ये अत्यंत विलक्षण अशा ‘श्रीशेषदत्त पादुका’ आहेत. शेषनागाच्या उदरामध्ये पादुका असे कदाचित हे एकमेव क्षेत्र आहे. मुख्य मंदिराच्या बाजूलाच श्री शनेश्वर मंदिर व नवगृह आहेत. त्यामुळे असंख्य लोक या ठिकाणी भेटी देण्यासाठी येत असतात.

अशी आख्यायिका आहे की, द्वापारयुगा नंतर कलियुगाची सुरुवात झाल्याने पाच पांडव द्रौपदीसह बद्रीनाथकडे निघून गेले. तेव्हा अभिमन्युचा मुलगा परीक्षित आणि त्याचा मुलगा जन्मेजय याने एक मोठा यज्ञ केला. तेव्हा त्या यज्ञातून जन्मलेले बालक अत्यंत हसतमुख आणि अतिशय आनंदी वृत्तीचे असल्याने त्यांना सदानंद म्हणून ओळखले जात असे. श्री सदानंदाच्या या रूपाने श्री दत्तप्रभूंनी कलियुगाच्या प्रारंभी जन्म घेतला अशी येथील भाविकांची श्रद्धा आहे. या सदानंदांनी बालपणीच अतिशय उग्र तपश्चर्या करून श्रीशंकराला प्रसन्न करून घेतले. शंकरांच्या आज्ञे नुसार सदानंद गुरू च्या शोधात पश्चिम दिशेला निघाला. तो जात असताना शंकराने सांगितल्याप्रमाणे प्रत्येक हजार पावले टाकल्यावर ‘अहो, श्रीदत्ता’ अशी दत्तात्रेयांचा गजर मजल दरमजल चालताना त्यांनी बसवकल्याण मधील या ठिकाणी आले असता त्यांना श्री दतात्रेयांचा ओ म्हणून प्रतिसाद मिळाला तेव्हा त्यांनी अवधूतांचे दर्शन घेण्यासाठी याच ठीकांनी बसून तपश्चर्या केल्याने या ठिकाणी श्रीदत्तात्रेयांने सदानंदाला दर्शन देऊन त्यांच्यावर अवधूताने पूर्ण कृपा केली. पुढे त्यांनी कल्याण येथे आनंद संप्रदायाची स्थापना केली. त्यामुळे हे मंदिर पाहण्यासाठी व दर्शनासाठी असंख्य लोक येत असतात.

एखाद्या गढीसारखे हे मंदिर असून मंदिरात एकूण नऊ भुयारे आहेत. प्रत्येक भुयारामध्ये अनेक मठाधीशांच्या समाधी आहेत. या भुयारांमध्ये आत उतरून गेल्यावर त्या समाध्या पाहून अक्षरशः थक्क होते व विलक्षण अनुभूती येते. या क्षेत्राचे विशेष म्हणजे येथे श्री सदानंद स्वामी महाराजांची संजीवन समाधी आहे. मदिराजवळ ४८ व इतर ठिकाणी ३० अशा एकूण ७८ मठाधीशांच्या समाध्या आहेत.

बसवेश्वर मंदिर:

१२ व्या शतकात कल्याणच्या चालुक्य राजवटीत महात्मा बसवेश्वरांना समर्पित केलेले हे एक शिवलिंग मंदिर असून ते लिंगायत समुदायाचे श्रध्दास्थान आहे. सध्या मंदिराचे जुने बांधकाम काढून नवीन बांधकाम करण्यात येत आहे.

परस कट्टा:

बसवकल्याण भुईकोट किल्ला गांधी चौक कडे येते वेळी किल्लापासून कांही अंतरावरच परस कट्टा हे एक दगडी व्यासपीठ आहे. परस म्हणजे दार्शनिकाचा दगड असा त्याचा अर्थ असून एका परंपरेनुसार, बसवेश्वरांनी येथे बसून गरजूंना भिक्षा आणि आपल्या शिष्यांना विरशैव-लिंगायत पंथाची दीक्षा देऊन वचनांची रचना केल्यामुळे हे स्थान पवित्र मानले जाते. या परस-कट्टाजवळ चालुक्य मंदिराचे अवशेष पाहायला मिळतात.

बसवेश्वर महामने:

महात्मा बसवेश्वरांचे वास्तव्य असलेल्या निवासस्थानास लोक आदराने महामने म्हणतात. हे एक ज्ञानाचे घर घर समजून महात्मा बसवेश्वरांचे आध्यात्मिक मार्गदर्शन आणि आशीर्वाद घेण्यासाठी असंख्य शरण महामाने येथे येत असत आणि येथे मोठ्या संख्येने लोकांना दररोज मुक्तपणे भोजन दिले जात असे. महामने जवळच एक सुंदर ईश्वर आणि नंदीचे मंदिर आहे.

बाल उद्यान:

तिपुरांत तळयाच्या काठावर सुंदर असे बाल उद्यान उभारण्यात आलेले असून उद्यानात अनेक मनोरंजनाचे खेळ आहेत. सुदर अशा नाना प्रकारच्या वनस्पती, पुले, वेळी यांनी हे उद्यान सजलेले असून वृंदावन उद्यानाच्या धर्तीवर या उद्यानात दररोज संध्याकाळी रंगीत व संगीत कारंजे पर्यटकांचे मन वेधून घेतात.

या व्यतिरिक्त प्रभुदेवेंद्र गदगी मठ, अक्का नागम्माच्या लेण्या, नुलिया चांदय्याची गुहा, घनलिंग रुद्रमणीची गुहा पंचसूत्र गुहा, विज्ञानेश्वराची गुहा, मडीवाळ माचय्याचे होंडा (तलाव), काझीची मशीद किंवा पीरांचा दर्गा, गोसावी मठ, बसव वन असे अनेक ठिकाणे शहरात प्रेक्षणीय आहेत.

शिवसृष्टी :

बसवकल्याण तालुक्यातील अनेक गावे मराठी भाषिक आहेत. हि भूमी महात्मा बसवेश्वरांनी दिलेल्या समतावादी विचाराची असल्याने या भूमीत महात्मा बसवेश्वर, त्यांचे प्रमुख (शरण) वचनकार, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधीसह अनेक महापुरुषांचे आकर्षक पुतळे आहेत. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज सर्वासाठी प्रेरणादायी व आदर्श व्यक्तिमत्व असल्याने त्याचा इतिहास तेवत राहावा या हेतूने येथे शिवसृष्टी निर्माण करण्यात यावी हि लोकांची मागणी लक्षात घेऊन खा. भगवंत खुवा, आ. शरनु सलगर, आ. मारोतीराव मुळे, तात्याराव पाटील व आदी लोकांच्या कर्नाटक शासनाकडे केलेल्या पाठराव्यामुळे शिवसृष्टी साठी कर्नाटक सरकारने १० एक्कर जागा कांही निधी मंजूर करून शिवसृष्टी विकासाचे काम हाती घेतलेले आहे. त्यामुळे भविष्यात हे एक सुंदर पर्यटन स्थळ म्हणून विकसित होणार आहे.

ISBN: 978-93-5810-881-1

मोरखंडी:

मोरखंडी हे एक अतिशय प्राचीन पण अनेक उध्वस्त मंदिरांचे गाव असून बसवकल्याण शहराच्या पश्चिमेस १०कि. मी. अंतरावर आहे. इतिहासातील मयूरखिंडी वरून या गावचे नाव मोरखंडी झाले असावे. काही विद्वानांच्या मते मयूरखंडी येथे राष्ट्रकूट राजा गोविंदा तिसरा यांने आपली राजधानी बनवली होती. गावात अनेक बदामी, चालुक्य कालीन मंदिर असून ते जीर्ण अवस्थेत आहेत. गावाच्या पूर्वेस टेकडीवर श्री सिद्धेश्वराचे चालुक्यकालीन भव्य मंदिर असून मंदिरात शिवलिंगाची पूजा केली जाते. मंदिरातील शिवलिंग पूजा व अभिषेकास अत्यंत महत्व असून अभिषेक पुजेद्वारे पूलप्राप्ती करण्यासाठी अनेक भाविक भक्त मोरखंडी येथे दर्शनासाठी येत असतात.

चंडकापूर:

महाराष्ट्र- कर्नाटक सीमावर्ती भागात राष्ट्रीय महामार्ग क्र.९ बसवकल्याण-उमरगा मार्गावर बसवकल्याण शहराच्या नैऋत्येला २० किमी अंतरावर चंडिकापूर गावालगत रामलिंगेश्वर, सोमलिंगेश्वर आणि रेवणसिद्धेश्वराच्या देवस्थानांसाठी लोकप्रिय अमृतकुंड हे पर्यटन स्थळ असून या भागाला कर्नाटक, महाराष्ट्र व तेलंगणा राज्यातील अनेक पर्यटक भेटी देत असतात.

या व्यतिरिक्त तालुक्यात हारकुड येथील मठ व मंदिर, हुलसूर येथील रामनाथ स्वामी मठ या ठिकाणीही स्थानिक पर्यटक मोठ्या प्रमाणात येतात.

भारताची लोकशाहीचे आधारस्तंभ



"हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा असे नच म्हणवावे...
हा आमुचा, हा आमुचा, हा आमुचा असेचि वदवावे....
कुडलसंगमदेवा तुमच्या घरचा पुत्र म्हणावे." - महात्मा बसवेश्वर

ISBN: 978-93-5810-881-1

५. भाल्की तालुक्यातील पर्यटनस्थळे:

भाल्की हे कर्नाटकाच्या ईशान्य भागात बिदर जिल्ह्यातील तालुका आहे. भौगोलिकदृष्ट्या हा तालुका बिदर जिल्ह्याच्या मध्यभागी वसलेले असून तालुक्यास जिल्हातील बिदर, हुमनाबाद, बसवकल्याण आणि औराद या तालुक्याच्या सीमा लाभलेल्या आहेत तर महाराष्ट्रातील लातूर जिल्हातील निलंगा, शिरूर अनंतपाळ, देवणी व उदगीर तालुक्याच्या सीमा लाभलेल्या आहेत.

भाल्की हे जिल्हातील बिदर, हुमनाबाद, बसवकल्याण व औराद महाराष्ट्रातील निलंगा, उदगीर, शिरूर अनंतपाळ, देवणी या शहरांशी रस्ते मार्गांनी जोडलेले आहे. भाल्की परळी-बिदर-हैद्राबाद या एकेरी लोहमार्गावर रेल्वे स्थानक असून देशातील अनेक शहरांशी या रेल्वे स्थानकातून प्रवास करता येतो. हवाईमार्गाने प्रवास करण्यासाठी शहराला अत्यंत जवळचे विमानतळ (हवाई अड्डा) हैद्राबाद हे आहे.

या शहराला ऐतिहासिक परंपरा लाभलेली असून बदामी व कल्याणीचे चालुक्य कालखंडात या शहराला भालुंके देश म्हणून ओळखले जात असल्याचा उल्लेख महाराष्ट्रातील जमालागावच्या शिलालेखात आढळतो, हा शिलालेख चालुक्यांचा राजा विजयादित्य पाचवा याच्या इ.स. ६९६ या काळातील आहे. दुसरा आणखीन एक शिलालेख अकराव्या शतकातील असून हे शहर कुमार हेमादीची राजधानी असल्याचे त्यात उल्लेख आहे. हेमादी हे कल्याणच्या चालुक्यांचा अधीनस्थ राजा होता.

बाराव्या शतकात बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या अनुभव मंडपम चा या दिशेतील शेवटचा शिष्य किंवा शरण हा भाल्कीचा असल्याने शरणांचे स्थान म्हणून भाल्कीला कल्याणचे शेवटचे द्वार संबोधले जात असे. हरिहर यांनी आपल्या रचनेमध्ये कुंभार गुंडय्या नावाच्या शरणाचा उल्लेख केला आहे जो भाल्कीचा रहिवासी होता. त्याने त्याचे वर्णन शरण म्हणून केले. ज्याने भक्तीत तल्लीन होऊन नाचताना शिवालाही आपल्यासोबत नाचवले. आजही भाल्की मधील कुंभार गल्लीत कुंभेश्वर म्हणून ओळखले जाणारे शिवमंदिर त्याची साक्ष म्हणून ओळखले जाते.

त्यानंतर रामचंद्र जाधव या मराठा सरदाराने येथे किल्ला बांधून या शहराला वैभव संपन्न बनवले. पुढे हे शहर निजाम राजवटीत खुर्शीद जाहच्या पैगा तालुक्याचे मुख्यालय बनले. अशा प्रकारे अनेक सत्तांतरे व धार्मिक आधार लाभल्याने तालुक्यात अनेक लहानमोठे पर्यटन स्थळे असून त्यातील खालील कांही महत्वाची पर्यटन स्थळे आहेत. शहरातील प्राचीन व प्रसिध्द भाल्केश्वर या शिव मंदिराच्या सानिध्यामुळे या शहराला भाल्की या नावाने ओळखले जात असावे. पोलीस एक्शन नंतर स्वातंत्रोत्तर काळात तो कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हाच्या भूभाग झालेला आहे.

भाल्कीचा किल्ला :

भाल्कीच्या रेल्वे स्थानकापासून २ कि.मी. अंतरावर आणि बिदरपासून ४४ कि.मी. अंतरावर चालुक्य कालीन भाल्कीचा किल्ला आहे. इ.स.१८२० ते १८५० दरम्यान रामचंद्र जाधव आणि धनाजी जाधव यानी हा किल्ला बांधला. पाच एकरात २० फूट उंच भिंतीचा एका बुरूजासह हा चौकोनी

ISBN: 978-93-5810-881-1



आकारातील किल्ला आहे. किल्लाचे बांधकाम काळया दगडाचे असून बांधकामासाठी चुना वापरण्यात आलेला आहे. किल्ल्याला २१ फूट उंचीची तटबंदी असून ८

बुरूजासह २ सुसज्ज दरवाजे आहेत. किल्ल्यात एक विहीर असून विहिरीतून किल्ल्याबाहेर जाण्याचा गुप्त मार्ग असल्याचे समजते. किल्ल्ह्यात श्री कुंभेश्वर गणेश मंदिर आहे. किल्ल्यात मराठा सैन्याचा शस्त्रास्त्र साठा होता. ब्रिटिशांच्या काळात भाल्कीचा हा किल्ला हैद्राबादच्या निजामाच्या ताब्यात आला होता. निजाम कालापासून या ठीकांनी शाळा सुरु असून आजही किल्लात शाळा भरत असल्याने किल्ला पाहण्यासाठी शाळा सुरु असलेल्या वेळेत गेल्यास सोयीचे होते.

मैलार मल्लना मंदिर:

भाल्की तालुक्यातील खानापूर रेल्वे स्थानकापासून 2 कि.मी. तर बिदरपासून 15 कि.मी. अंतरावर बिदर-उदगीर रोडवर खानापूर गावात श्री मैलार मल्लना मंदिर हे प्राचीन खंडोबाचे मंदिर आहे.हे क्षेत्र पौराणिक मनिचुर पर्वताचा भूभाग असून या पर्वतावर मल्लासूर व मणिकासूर हे दोन राक्षस होते. या राक्षस भावांनी ब्रम्हदेवाची कठोर तपश्चर्या करून पृथ्वीवर या दोघांपेक्षा कोणीही शूर, वीर, श्रेष्ठ, महान राहू नये असे अजिंक्यतेचे वरदान मिळवले होते. त्यामुळे हे दोघेही मैलारच्या आसपास राहणाऱ्या ऋषीमुनींना आणि निर्दोष लोकांचा छळ करून ठार मारू लागले. स्त्रियांचा छळ करू लागले. एवढेच नाही तर देवता विष्णू आणि इंद्रदेव यांना देखील या दोन राक्षसांनी युद्धात हरवले. तेव्हा ऋषीमुनी शिवशंकराला या दोन राक्षसापासून वाचवण्याची व त्यांचे रक्षण करण्याची विनंती केली. तेव्हा महादेवांनी रागात आपल्या जटा आपटल्याने त्यातून घृतमारी देवी प्रकट झाली. तेव्हा तिला महादेवाने त्या दोन राक्षसांचा वध करण्याची आज्ञा दिली. त्यानुसार घृतमारी देवी मनिचूर पर्वतावर प्रकट होऊन त्या दोन राक्षसासोबत ती युद्ध करू लागली. मात्र युद्धात राक्षस तिलासरस ठरत असल्याने तिने शिवशंकराला विनंती करून प्रकट होण्याची विनंती केल्याने महादेव मल्लनाच्या रुपात पांढऱ्या घोड्यावर बसून प्रकट झाले. त्यांच्यासोबत पांढऱ्या घोड्यावर बसलेल्या मल्लनाच्या पाठीमागे घृतमारी देवी घोड्यावर बसली आणि त्या दोन राक्षसांसोबत

ISBN: 978-93-5810-881-1

प्रचंड युद्ध करू लागली. भगवान मल्लना खडग शस्त्राने असुरावरती वार करू लागले. तेव्हा त्या राक्षसाचे रक्त जमिनीवर पडले की एका रक्ताच्या थेंबापासून अनेक राक्षस निर्माण होऊ लागले. हळूहळू दैत्याची सेना वाढत गेली. हे पाहून मल्लनाने घृतमारी देवीला आदेश दिला की, हे देवी तू या रणभूमीवरती तुझी जीभ ठेवून दे आणि राक्षसांचे रक्त प्यायला सुरु कर. तेव्हा देवीने आपली जीभ रणभूमीवर ठेवली. त्या जिभेवरच युद्ध चालले. राक्षसांचे रक्त घृतमारी देवी पिऊ लागली तेव्हा राक्षसांची संख्या कमी झाली. मल्लनाने मंत्रशक्तीद्वारे देवाची सेना जिवंत केली. त्या सैन्या कडून माणिकासूर राक्षस मारला गेला. तेव्हा मल्लसुराने भगवान मल्लनासोबत भयंकर युद्ध करू लागला. शेवटी तो युद्धात पराजित झाला. तेव्हा मल्लासुराने भगवान मल्लनाचे चरण धरले आणि म्हणाला, मी तुमच्या चरण स्पर्शाने धन्य झालो. मला ज्ञानाची प्राप्ती झाली अशी देवाची स्तुती करू लागला. तेव्हा मल्लनाने त्याच्यावर प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितले तेव्हा मल्लासुराने वर मागितला की जो भक्त तुमची स्तुती करेल त्याच्यावर तुमची कृपा असो. तुमच्या नावाच्या अगोदर माझे नाव येवो. तुम्ही याच क्षेत्रात राहून माझे नाव अमर करा हा वर मागितला. त्यामुळेच या क्षेत्रास मैलार मल्लना असे संबोधले जाते. या क्षेत्राला पूर्वी प्रेमपूर म्हणून हि ओळखले जात असत.



मैलार मल्लना हे मंदिर उत्तर कर्नाटकामधील खूप प्रसिद्ध ठिकाण असून या ठिकाणी काशीवरून पाणी येत असल्याचे म्हंटले जाते त्यामुळे या क्षेत्राला दक्षिण काशी म्हणून देखील ओळखले जाते. या ठीकांनी खंडोबाचे सुंदर मंदिर असून मैलार मल्लना मंदिरास एक भव्य प्रवेशद्वारा सह चारही बाजूने दरवाजे असून त्या सभोवताली ओवऱ्या आहेत. मुख्य मंदिर सोळा खांबी उघड्या दगडी मंडपावर आहे. याच्या पश्चिमेला पूर्वाभिमुख बंदिस्त गूढ मंडप आहे. त्याच्या पश्चिमेला गाभारा असून गर्भगृहात एका चौथऱ्यावर मल्लना देवाच्या पादुका आहेत. त्यांच्या मागे द्विलिंग आहे. त्याच्या पाठीमागे एका आसनावर खंडेबाची चर्तुर्भूज बसलेली मूर्ती आहे. याच्या आसनावर खाली घोड्याची आणि कुत्र्याची प्रतिमा कोरलेली आहे.

ISBN: 978-93-5810-881-1

आसनाच्या मागे नंदीची प्रतिमा कोरलेली आहे. खंडोबाच्या दोन्ही बाजूला हात जोडून उभ्या असलेल्या खंडोबाच्या दोन्ही बायका म्हाळसाबाई आणि बाणाई यांच्या प्रतिमा आहेत. तिथेच बाजूला धातूच्या मूर्त्या ठेवलेल्या आहेत. मंदिराच्या वायव्येस दोन कुंड आहेत. यातल्या पूर्वेस असलेल्या कुंडात चारही बाजूने पायऱ्या आहेत. त्याच्या पश्चिमेस एक मोठे तलाव आहे. जवळच नैऋत्येस एक ज्योर्तिलिंगाचे मूळ मंदिर आहे. या मंदिराच्या पश्चिमेस एक पूर्वाभिमुख खंडोबाचे स्वयंभू लिंग मंदिर आहे.

मुख्य मंदिरातील खंडोबाच्या कपाळावर चंद्रकोर असून डोळयाला सोन्याने सूर्यासारखा चमकणारे आच्छदन लावून मार्तंडा भैरवाचे सुरेख रूप बनवण्यात आलेले आहे. खंडोबाची विठ्ठलासारखी देहयष्टी, पांढरे तांबडे धोतर, डोक्याला रुमाल, अंगरखा, उपरणे असा साधाच वेश आहे. खंडोबाच्या चार हातात खड्ग, त्रिशूळ, डमरू व रुधीर मुंडासह पानपात्र आहे. त्यामुळे ते लाखो भाविकांच्या आकर्षणाचे कारण आहे. खंडोबा हा भक्तांच्या मनोकामना पूर्ण करतो, नवसाला पावतो त्यामुळे अनेक भाविक लोक येथे नवस फेडायला येतात.

कारंजा जलाशय:



भाल्की तालुक्यातील ब्यालहळ्ळी गावाजवळ गोदावरी नदी खोऱ्यातील गोदावरी नदीची मुख्य उपनदी असलेल्या मांजरा नदीची सहाय्यक उपनदी असलेल्या कारंजा नदी वर कारंजा सिंचन प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. बिदर, भाल्की, औराद, हुमनाबाद तालुक्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कारंजा जलाशय १९७२ मध्ये बांधण्यात आला. ३८६१४ हेक्टर जमीनीवर ९.२७ टीएमसी क्षमता असलेले हे धरण असून त्याच्या उजव्या आणि डाव्या दोन्ही काठावर कालवे आहेत. RBC ची एकूण लांबी 131 किमी आहे आणि LBC ची लांबी 31 किमी आहे. हे निसर्गरम्य ठिकाण असून अनेक देशी विदेशी पक्षी, प्राणी व वनस्पतीचे ठिकाण असल्याने एक दिवशीय पिकनिक/हॉलिडे स्पॉट म्हणूनही लोकप्रिय आहे.

संगम:

कारंजा आणि मांजरा नद्यांचा संगम भाल्की तालुक्यातील नारदा संगम या गावाजवळ होतो, त्या ठिकाणी श्री संगमेश्वराचे सुंदर मंदिर आहे.

ISBN: 978-93-5810-881-1

६. हुमनाबाद तालुक्यातील पर्यटनस्थळे

हुमनाबाद हा हैद्राबाद-सोलापूर-पुणे या राष्ट्रीय महामार्ग व कलबुर्गी-बिदर राज्य महामार्गा लगत असलेले एक महत्वाचे शहर असून याच्या उत्तरेला भाल्की, पूर्वेला बिदर तालुका आणि दक्षिणेला झैराबाद (तेलंगणा), उत्तरेस कलबुर्गी जिल्ह्यातील चिंचोली आणि कलबुर्गी (गुलबर्गा) तालुका तर पश्चिमेस बसवकल्याण तालुका आहे. हे शहर बसवकल्याण पासून ३०, बिदर पासून ५०, भाल्की पासून ३९, झैराबाद पासून ५५ तर कलबुर्गी पासून ६४ कि.मी. अंतरावर असून रस्ते मार्गाने जोडलेले आहे. बिदर-गुलबर्गा रेल्वे मार्गावर असल्याने या शहरातून रेल्वे सुविधा उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त भाल्की, बिदर व कलबुर्गी रेल्वे स्थानकावर उतरून बसने या शहराला प्रवास करता येते. शहराच्या जवळचे विमानतळ हे हैद्राबाद आहे.

हुमनाबाद तालुक्याला एक ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. पूर्वी या शहराचे नाव गडवंती गाव, नंतर जयसिंहनगर असे होते. भाल्की येथे किल्ला बांधणारे मराठा सेनापती धनाजी जाधव यांचे वंशज व हैद्राबाद निजामाच्या दरबारी सरदार असलेले राजा रामचंद्र जाधव यांनी हुमनाबाद शहर वसवल्याचे म्हटले जाते. या ठिकाणी एक किल्ला सुध्दा आहे. जो जांभ्या खडका पासून बांधलेला आहे. या व्यतिरिक्त या तालुक्यात श्री विरभद्रेश्वर मंदिर, श्री माणिक प्रभू मंदिर, कारंजा जलाशय, हांकुनी किल्ला व रेकुळगी येथील बुद्ध विहार हि प्रेक्षणीय स्थळे आहेत.

श्री विरभद्रेश्वर मंदिर :

हुमनाबाद रेल्वे स्थानकापासून २ कि.मी. तर बिदरपासून ५० कि.मी. अंतरावर हुमनाबाद येथे स्थित श्री विरभद्रेश्वर मंदिर हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. हे भगवार विरभद्रेश्वराचे एक सुप्रसिद्ध जुने मंदिर आहे. या मंदिरामध्ये भगवान विरभद्रेश्वर त्यांच्या उजव्या हाताला तलवार आणि डाव्या बाजूला चांदीच्या आच्छादनासहित दिसतात. येथील मूर्तीला दक्षब्रम्हा म्हणून ओळखले जाते. गर्भगृहातील शिखरामध्ये भगवान महादेवाच्या लीला व भगवान विष्णूचे दशावतार आणि पौराणिक कथा दाखविणारे चित्र रेखाटले आहेत.

इ.स.१७२५ मध्ये राजा रामचंद्र जाधव या मराठा सरदाराने हे श्री विरभद्रेश्वराचे मंदिर बांधले होते.



भगवान महादेवाचा वीरभद्र हा अवतार आहे. हे मंदिर त्याच्या हलत्या फिरत्या स्तंभासाठी/खांबासाठी प्रसिद्ध आहे. गर्भगृहातील मूर्ती अतिशय भव्य आहे. मंदिरात सुमारे

ISBN: 978-93-5810-881-1

५०फूट उंचीचे दोन दीपस्तंभ आहेत. पौराणिक कथेनुसार महादेवाचे सासरे दक्ष यांनी त्यांच्या दरबारामध्ये विशाल यज्ञ आयोजित केला होता. वीरभद्र हे वीरशैव लिंगायत, मुख्यत: कर्नाटक आणि तामिळनाडू येथील पंचम-आचार्यांच्या प्राथमिक देवतांपैकी एक आहेत. यज्ञासाठी त्यांनी सर्व देवदेवतांना, ऋषीमुनींना बोलावले पण त्यांची पुत्री सती आणि भगवान शंकराला (महादेवाला) दक्षने आमंत्रित केले नाही. तरी देखील दक्ष प्रजापतींच्या या यज्ञात महादेव व पत्नी सती न बोलवता आल्याने दक्षने तिचा सर्वांसमोर अपमान केला. स्वतःचा अपमान तिच्या नवऱ्याचा झालेला अनादर पाहून सतीने यज्ञामध्ये उडी मारून आत्मदहन केले. भगवान महादेवाला ही बातमी कळाल्यानंतर त्यांच्या क्रोधाग्नीतून त्यांनी आपल्या जटांमधून विरभद्र नावाचा गण तयार केला. विरभद्र भगवान महादेवाच्या सांगण्यावरून दक्षच्या यज्ञाच्या ठिकाणी पोहचले आणि त्याने दक्षला पकडून शरीरापासून (धडातून) त्याचे डोके कापले. रक्ताने तेथील जमीन लाल केली. नंतर ब्रम्हा, विष्णू हे देव कैलास पर्वतावर गेले जावून महादेवाला विनंती करून दक्षला जिवंत करण्याची विनंती केली असता महादेवाने बकरीचे डोके दक्षच्या धडाला जोडले आणि त्याला जीवनदान दिले. अशा पद्धतीने धार्मिक महत्व असल्याने या मंदिराला असंख्य लोक भेटी देण्यासाठी येतात. जानेवारी- फेब्रुवारी महिन्यात येथे जत्रा भरते.



श्री माणिकप्रभू मंदिर:

हुमनाबाद जवळील माणिक नगर या ठिकाणी श्री. माणिकप्रभू हे एक हिंदू मंदिर आहे. माणिकप्रभू महाराज है एक संत, तत्त्वज्ञ, कवी आणि गुरु होते. असे सांगितले जाते की, शिर्डीचे साईबाबा, अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज असे महान संत माणिकप्रभूशी संवाद साधण्यासाठी माणिकनगरला आले होते. लोक माणिकप्रभूना दत्तात्रेयाचा अवतार मानतात.

माणिकप्रभू यांचा जन्म १८१७ मध्ये झाला तर १८६५ मध्ये त्यांनी समाधी घेतली. श्री. माणिकप्रभू मंदिर त्यांच्या समाधीवर बांधलेले आहे. संत श्री माणिकप्रभू यांनी अनेक भाविक भक्तांच्या वेदना समजून घेऊन भक्ताचे दुःख दूर केले. हे संत त्यांच्या रहस्यमय शक्तीसाठी प्रसिद्ध होते. त्यांनी लोकांना भक्तीच्या मार्गावर चालण्याची शिकवण दिली. ते सर्व समुदायाचा आदर करीत होते. त्यामुळे त्यांना लोकांनी सकलमाचार्य पदवी दिली. त्यांच्या कविता ब्रम्हाला समर्पित आहेत. माणिकप्रभू महाराजांनी धार्मिक सुसंवाद आणि वैश्विक बंधुत्वाचा संदेश दिलेला आहे.

श्री माणिकप्रभू मंदिर विराज आणि गूरकगंगा या दोन पवित्र नद्यांच्या संगमावर आहे. हे मंदिर एक प्रमुख अध्यात्मिक धार्मिक केंद्र असून या मंदिराचे वास्तूकला सौंदर्य अप्रतिम आहे. या मंदिराला हिंदू आणि मुस्लिम या





दोन्ही धर्माचे भाविक येतात. श्री संत माणिकप्रभू हे दत्ताचे अवतार होते समजून श्री दत्त जयंती रोजी माणिकप्रभू जयंती मोठ्या पद्धतीने साजरी केली जाते. बिदर जिल्ह्यातील पर्यटन विभागाने इ.स. २०१७ मध्ये या ठीकांणी पर्यटकांसाठी पर्यटक निवास बांधून बांधलेले आहे.

राजराजेश्वरी देवी मंदिर हुमनाबाद:

हुमनाबाद बसस्थानकापासून २ कि.मी. अंतरावर राजाराजेश्वरी देवीचे मंदिर आहे. मागील दशकात विकसित करण्यात आलेले हुमनाबाद येथील राजराजेश्वरी मंदिर प्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास येत असून या ठिकाणी भव्य प्रवेशद्वार, मंदिरामध्ये जाण्यासाठी अनेक पायऱ्या, सुंदर व प्रशस्त सभागृह, त्यात असलेल्या निरनिराळ्या देवतांच्या मुर्त्या, उंच कळस शिखरे मन वेधून घेतात, यातील त्रिमूर्ती गणेशाची सुंदर मूर्ती सगळ्यांनाआकर्षित करते.



जलसंगी:

हुमनाबाद शहरापासून सुमारे १०कि.मी. ईशान्येस जलसंगी हे प्राचीन गाव असून एका आख्यायिकेनुसार, हे स्थान महाभारत काळातील विराटाच्या राज्याची राजधानी होती, जिथे पाच पांडव बांधवांनी त्यांच्या वनवासाचा काही काळ घालवला होता. या ठिकाणी टाक्याच्या काठावर ईश्वराचे अप्रतिम कल्याण चालुक्य कालीन मंदिर आहे जे भग्नावस्थेत आहे. हे मंदिर चालुक्य सम्राट विक्रमादित्य

ISBN: 978-93-5810-881-1

सहावा च्या काळात बांधले गेले होते. त्याच्या बाहेरील भिंतींमध्ये काही सुंदर शिल्पे आहेत, त्यापैकी एक विक्रमादित्यचे बोलणे, कन्नड वर्णांमध्ये संस्कृत शिलालेख लिहिणारी स्त्रीची उल्लेखनीयपणे कोरलेली आकृती आहे. नाचण्याच्या विविध आसनांमध्ये, मोहक अलंकार परिधान केलेल्या, अतिशय बारकाईने कोरलेल्या स्त्रियांच्या रेखाचित्रांचे इतरही अनेक आकर्षक चित्रे असून हे कल्याण चालुक्य कलेचे हे एक उल्लेखनीय केंद्र आहे असून या ठिकाणी इतर अनेक इमारतींचे आजही अवशेष आहेत.

हळ्ळीखेड:

हुमनाबाद तालुक्यातील प्रसिध्द मोठे निम्न शहर असलेले ठिकाण असून या ठिकाणी कागद कारखाना आहे. तसेच या ठिकाणी श्री नागनाथस्वामी मंदिर असून या शहरात श्री भगवान शंकराची भव्य व विलोभनीय मूर्ती साकारण्यात आलेली आहे. येथील श्री नागनाथस्वामी वार्षिक यात्रा प्रसिद्ध आहे.

ISBN: 978-93-5810-881-1

७. औराद तालुक्यातील पर्यटनस्थळे

औराद (बाराळी) हा महाराष्ट्र- कर्नाटक सीमेवरील बिदर जिल्हातील कर्नाटक राज्याचे उत्तरेकडील शेवटचे टोक आहे. या तालुक्याचे विभाजन करून पश्चिमेस भागात नव्याने कमलनगर हा तालुका निर्माण झालेला आहे. औराद बी. बिदर पासून १०० भाल्की पासून ४०, बसवकल्याण व हुमनाबाद पासून ८५ कि.मी. अंतर दूर असून याच्या दक्षिणेला बिदर जिल्हातील भाल्की व बिदर तालुक्याच्या सीमा लाभलेल्या आहेत. उत्तरेस महाराष्ट्रातील नांदेड आणि उस्मानाबाद, ईशान्येस तेलंगणा राज्यातील निझामाबाद जिल्हा आहे. त्यामुळे हा तालुका महाराष्ट्र- कर्नाटक व तेलंगणा या राज्यातील महत्वाचा दुवा असून तो रस्ते मार्गाने जोडलेला आहे. तालुक्यात २६ कि.मी. अंतरावरील नव्याने विकसित होत असलेल्या कमलनगर या तालुक्याच्या ठिकाणी रेल्वे स्थानक आहे.

राष्ट्रकूटांनी या प्रदेशावर राज्य केले. त्यानंतर कल्याणचे चालुक्य, त्यानंतर बहमनी सुलतान अशा घराण्यांनी येथे सत्ता उपभोगली आहे. श्री अमरेश्वर मंदिरात तुटलेल्या स्वरूपात सापडलेला शिलालेख व औरादच्या कन्या शाळेच्या आवारात सापडलेला शिलालेख यावरून या शहराला पूर्वी आवरवाडी' किंवा "अमरवाडी" अशा नावाने ओळखले जात असावे. चालुक्य राजा विक्रमादित्य सहावाच्या काळातील शिलालेखांमध्येहि आवरवाडी हे नाव सापडले आहे.

या तालुक्याचा फारसा इतिहास प्राप्त होत नसला तरी या भूभागास एक ऐतिहासिक परंपरा व वारसा लाभलेला आहे. तालुक्यात लहान मोठे अनेक ऐतिहासिक मंदिरे, मज्जीद असे धार्मिक स्थळे, नदीचे संगम असे स्थानिक पर्यटन स्थळे असून अनेक गावात यात्रा महोत्सव साजरा केला जातो. या तालुक्यातील श्री अमरेश्वर मंदिर विख्यात आहे. कमलनगर तालुक्यातील नंदी बिजलगाव वनपरिक्षेत्रात नीलगायांचा कळप पहायला मिळतात.

१२ व्या शतकातील शरण चळवळीमुळे कन्नड साहित्य बहुमोल कन्नड लोकांपर्यंत पोहोचल्याने कांही भागात कन्नड भाषा बोलली जाते. तालुक्याच्या उत्तर आणि पश्चिम भागातील बहुतांश गावांची मातृभाषा मराठी असल्याने येथे मराठी भाषेचे प्राबल्य आहे. आताही औराद तालुक्यातील सुमारे ८१ गावांमध्ये मराठी भाषिक आहेत, पूर्वेकडील काही गावे आंध्र प्रदेशच्या सीमेला लागून असल्याने तेथे तेलगूचा थोडासा प्रभाव आहे.

श्री. अमरेश्वर मंदिर

औरादच्या बसस्थानकापासून २ कि.मी. अंतरावर श्री अमरेश्वर मंदिर असून मंदिराच्या प्रवेशद्वारापाशी दोन गजा लक्ष्मी आणि चंद्रशिळेचे एक व्यासपीठ आहे. व्यासपीठावर आपले दोन्ही गुडघे टेकवून अमरेश्वराला नमस्कार करण्यासाठी कासव (टॉर्टोईस) दगड आहे. ज्या ठिकाणी आता अमरेश्वराचे मंदिर आहे त्याठिकाणी पूर्वी भले मोठे जंगल होते. जंगलात एक वारूळ होते. वारुळाला एक गाय तिचे

ISBN: 978-93-5810-881-1



दूध पाजत होती. हे पाहून लोकांनी वारूळ खोदण्यास सुरुवात केली. तेव्हा तेथून एक आवाज आला की, मी अमरेश्वर आहे. माझे वारूळ खोडू नका माझे केवळ चिंतन करा.

१० व्या शतकात एका भक्ताने भगवान श्री अमरेश्वराच्या मंदिर बांधून त्यांची पूजा अर्चा सुरु केली. त्यामुळे अनेक भक्त या मंदिराचे दर्शन घेण्यासाठी पर्यटन करत असतात.

संदर्भ

i. Directorate of Census Operations Karnataka: District Census Handbook Bidar, Village and Town Directory,

ii. Godavari Jange: Tourism and regional development in Karnataka a study of bidar district: http://hdl.handle.net/10603/138908

iii. Rathod Balaji Ratan: http://hdl.handle.net/10603/382818

iv. Kanade Pallavi Kanteppa: http://hdl.handle.net/10603/543235

v. Dr. Shivakumar V. Uppe: https://anubooks.com/wp-content/uploads/2017/05/9-RJPSSs-2-13.pdf

vi. http://www.dattamaharaj.com/%E0%A4%AC%E0%A4%B8%E0%A4%B5%E0%A4%95%E0%A4%B2%E0%A5%8D%E0%A4%AF%E0%A4%BE%E0%A4%A3%E0%A4%A3%A3

vii. https://www-nativeplanet-com.translate.goog/travel-guide/explore-basava-kalyana-in-bidar-district-of-karnataka-007935.html?_x_tr_sl=en&_x_tr_tl=hi&_x_tr_hl=hi&_x_tr_pto=imgs

डॉ. प्रा. शिवानंद तानाजीराव जाधव

सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख,
श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा ता. जामखेड
जि. अहमदनगर



- उपप्राचार्य, श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा ता. जामखेड
- प्राचार्य, (अतिरिक्त पदभार) ३.५ वर्ष
- पदवी १२ वर्ष व २ वर्ष पदव्युत्तर स्तरावर अध्यापनाचा अनुभव
- संशोधक मार्गदर्शक व पदव्युत्तर शिक्षक - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- सन्मान व पारितोषिक "Best Nation Builder Teacher Award-2023"
- विषय तज्ञ सदस्य, SARTHI शिष्यवृत्ती निवड समिती, २०२२
- BOOKS / CHAPTERS IN BOOKS PUBLISHED (05)
- RESEARCH PAPER PUBLICATION (18)
- Member of paper setting at university level.

प्रकाशित ग्रंथ

- State level multi-disciplinary workshop on National Education Policy- 2020 "Research and Development" (2023) ISBN: 978-81-958499-1-8
- ग्रामीण विकासाचा भूगोल (Geography of Rural Development -2021) 978-93-5566-817-2
- सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती (RESEARCH METHODOLOGY IN SOCIAL SCIENCE) 2022 ISBN: 978-93-5701-701-5
- बिदर जिल्हा भौगोलिक माहिती आणि पर्यटन स्थळे (Geographical Information & Tourist Centre in Bidar District) 2022 ISBN : 978-93-5810-881-1

Published By
ARYA NATIONAL PUBLICATION, BASAVKALYAN
Talbhog, Tal. Basavkalyan, Dist. Bidar (KS) 585327
Email: aryapublicationbk@gmail.com

ISBN 978-93-5810-881-1